मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर » मुंबई, शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४ » वर्ष- २९ » अंक - ७१ » पाने- ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६

किंमत : ३ रुपये



यशासाठी त्यांनी शारीरिक संबंध ठेवले; 30 वर्षे जुन्या नात्याचा हवाला

पान 8

## म ह त्त्वा चे

### दंगलींपेक्षा रस्ते अपघातात जास्त लोकांचा जीव जातो



**नागपूर :** राज्यातील हिट अँड रन प्रकरणांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. काही दिवसापूर्वी मुंबईतील वरळीचे हिट अँड रनचे प्रकरण ज्यामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला तर दुसरीकडे पुण्यात एका अल्पवयीन मुलाने दोन तरुणांना उडवल्याची घटना घडली होती. देशातील वाढत्या हिट अँड रन प्रकरणांबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी स्पष्टच मत मांडले आहे. ज्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. ते म्हणाले, जे पालक आपल्या मुलांना लहान वयात गाडी चालविण्याची परवानगी देतात त्या पालकांचे नाव जगजाहीर केले पाहीजे. तसेच जातीय दंगलींपेक्षा दरवर्षी रस्ते अपघातात जास्त लोकांचा जीव जातो, असे त्यांनी आज पुन्हा एकदा स्पष्टपणे म्हटले आहे.

### पश्चिम रेल्वेवरुन सुरु झाली गोवा ट्रेन

**मुंबई :** गणेशोत्सवासाठी मुंबईतून कोकणात जाणाऱ्या कोकणवासीयांची लगबग सुरू झाली आहे. परंतु, दोन महिन्याआधीच कोकणात जाणाऱ्या सर्व विशेष ट्रेनची बुकिंगही फुल झाल्याने कोकणात जाणाऱ्या लोकांनी संताप व्यक्त केला आहे. पण आता केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. पश्चिम रेल्वेवरूनह आता गोव्यासाठी रेल्वेसेवा सुरू करण्यात आली आहे. आठवड्यातून दोन दिवस ही रेल्वे धावणार असून आज गुरुवारी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी बोरिवलीतून या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला. मुंबई पश्चिम उपनगरात राहणाऱ्या कोकणवासियांना कोकणात जाणाऱ्या ट्रेन पकडण्यासाठी दादर येथे जावे लागत होते. वांद्रे टर्मिनस ते मडगांव दरम्यानच्या नवीन ट्रेनला बोरिवली येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

### मनोज जरांगेंचे 29 सप्टेंबरपासून पुन्हा उपोषण

**जालना :** मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी गुरुवारी पुन्हा एकदा महायुती सरकारविरोधात दंड थोपटले. यावेळी त्यांनी 29 सप्टेंबरपासून पुन्हा उपोषणाला बसण्याची घोषणा केली. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धडा शिकवण्याचाही निर्धार व्यक्त केला. सरकारने 28 सप्टेंबरपर्यंत आरक्षण दिले नाही तर मी 29 सप्टेंबरपासून उपोषणाला बसेन. ही आरपारची लढाई आहे. यावेळी देवेंद्र फडणवीस यांची जिरवायची म्हणजे जिरवायचीच, असेही ते म्हणाले.

# राणेंकडून जीवाला धोका

## आ. वैभव नाईकांचे पोलीस अधिक्षकांना पत्र

**प्रतिनिधी**
**कणकवली**

मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला आणि त्यावरून राज्यात राजकारण रंगले. राजकोट किल्ल्यावर पाहणीसाठी गेलेले मविआ नेते, विशेषतः ठाकरे सेनेचे नेते आणि भाजप खासदार नारायण राणे यांच्यात चांगलीच जुंपली. ठाकरे सेनेचे स्थानिक आमदार वैभव नाईक यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक सौरभकुमार अग्रवाल यांना एक पत्र दिले असून सुरक्षेची मागणी केली आहे.

राजकोट किल्ल्यावर पुतळा कोसळल्यानंतरच्या परिस्थितीची पाहणी करायला गेलो असताना नारायण राणे यांनी पोलिसांसमोर मला आणि माझ्या सहकाऱ्यांना जीवे मारण्याची धमकी दिली, असे वैभव नाईक यांनी पत्रात म्हटले आहे. यापूर्वी देखील आपले काका कै. श्रीधर नाईक यांची राजकीय वैमनस्यातून हत्या करण्यात आली होती.



या प्रकरणात नारायण राणे हे आरोपी असल्याचेही नाईक म्हणाले. राणे यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी पाहता त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे.

“मी, वैभव विजय नाईक वय 48 रा. बिजलीनगर कणकवली. गुरुवार दि. 28/08/2024 रोजी मालवण येथील राजकोट किल्ला येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पाहणी करण्यासाठी गेलो असताना तेथे उपस्थित असलेले खासदार नारायण राणे यांनी गोंधळ घालत आपल्या आणि सहकारी पोलिसांसमोरच, नारायण राणे यांनी मला आणि माझ्या सहकाऱ्यांना “एकेकाला रात्रभर घरातून खेचून मारून टाकेन अशी धमकी दिली. माझे काका कै. श्रीधर नाईक यांची राजकीय वैमनस्यातून हत्या झाली आहे. त्या प्रकरणात देखील नारायण राणे हे तेरावे आरोपी होते. तरी त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी लक्षात घेता त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, ही मागणी”, असं वैभव नाईक निवेदनात म्हणाले आहेत.

# हात लावेल तिकडे सत्यानाश झालाच पाहिजे, ये मोदी की गॅरंटी

## उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

**प्रतिनिधी**
**मुंबई**



आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा 8 महिन्यांत पडतो. पूर्वी दादा कोंडकेंचा सिनेमा होतो, बोट लावेल तिथे गुदगुल्या. आता मोदी नवा काढतायत हात लावेल तिकडे सत्यानाश... जिकडे हात हात लावेल तिकडे सत्यनाथ झालाच पाहिजे, ये मोदी की गॅरंटी आहे. अशा सडक्या गॅरंट्या आपल्याला नको आहेत, असे ठाकरेंच्या शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले. मुंबई उपनगरमधील गणेशोत्सव समन्वय समिती मार्गदर्शन सभेत ते बोलत होते.

उद्धव ठाकरे म्हणाले, मधल्या काही वर्षात आपली भेट झाली नव्हती. 5 वर्ष किमान भेट न होऊन झाली.बाप्पाच्या आधी तुमची भेट व्हायची. मात्र तुम्ही नातं तुटू दिलं नाही. मी तुम्हाला हक्काने बोलवलंय,काही सांगण्यासाठी बोलवलंय. आपण गणपती उत्सव म्हणून साजरा करतो. पालिका बरखास्त केलीय, राज्याला कोणी वालीच राहिलेला नाही. आपण वॉर्ड अधिकाऱ्याकडे जायचो आणि प्रश्न सुटायचे. विसर्जनाच्या बॅनर्सवर मुख्यमंत्री आणि पंतप्रधान यांचे फोटो असतात. ते सांकेतिक सांगतायत कोणाचं विसर्जन केलं पाहिजे.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, उत्सवावर आपण कोरोनात बंदी केली होती. मात्र काहींच्या अंगात शिरतं. गणपती बुद्धीदातादेखील होता, थोडी बुद्धी तर घ्यायची. जर कोणी बंधने आणली तर झुगारुन द्या. आपण खड्डे बुजवले होते, यांच्या कारभारालाच खड्डे पडलेत ते कोण बुजवणार?

लोकमान्यांनी स्वातंत्र्याची चळवळ केली आणि आपण त्याचा उत्सव केला. ही शक्ती जागी केली पाहिजे यासाठी टिळकांनी प्रयत्न केलेत. लोकमान्यांनी स्वातंत्र्याची चळवळ केली आणि आपण त्याचा उत्सव केला. ही शक्ती जागी केली पाहिजे यासाठी टिळकांनी प्रयत्न केलेत. स्वातंत्र्य मिळालं पण सरकार आता आहे की नाही हेच कळत नाही. लालबागचा राजा, गणेशगल्लीचा राजा वेगळी ओळख आहे. शाडूची मूर्ती पण करतो, माती द्या. जशी ही जबाबदारी घेतो तशी तुम्ही छत्रपतींच्या पुतळ्याची जबाबदारी का नाही घेतली? असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

# मालवण राड्याप्रकरणी 42 जणांसह दीडशे अनोळखी कार्यकर्त्यांवर गुन्हे

**प्रतिनिधी**
**मालवण**

कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण राजकोट येथील महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व भाजपाचे कार्यकर्ते यांच्यात झालेला राड्यानंतर आता मालवण पोलिसांनी एकूण 42 जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी अनोळखी 150 जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अनोळखी पदाधिकारी कार्यकर्त्यांची नावे ही सीसीटीव्ही फुटेज व्हिडिओ पाहून निष्पन्न करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मालवण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण कोल्हे यांनी दिली. मात्र याप्रकरणी गुरुवारी सायंकाळी उशिरापर्यंत कोणालाही ताब्यात घेण्यात आले नव्हते. राजकोट येथील काल झालेल्या राड्या प्रकरणी मालवण पोलिसांनी राणे समर्थक ठाकरे गटातील 21 तर भाजपमधील राणे समर्थक 21 अशा दंगा करणाऱ्या 42 जणांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

राजकोट किल्ला येथील कोसळलेल्या पुतळ्याच्या पाहणी दरम्यान बुधवारी राणे व ठाकरे समर्थक समोर आल्यानंतर मोठा राडा झाला होता. राणे समर्थक व ठाकरे गटाच्या पदाधिकारी कार्यकर्ते एकमेकांना भिडले होते त्यामुळे वातावरण तणावपूर्ण झाले होते. या सगळ्या प्रकरणात संभाजी पाटील, मेहक परब हे पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. त्याचबरोबर अनेक कार्यकर्ते जखमी झाले आहेत. या सगळ्या राडा प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

# शिवरायांचा पुतळा कोसळण्याची घटना आंतरराष्ट्रीय पातळीवर मान खाली घालणारी

## मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल

**प्रतिनिधी**
**मुंबई**



मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा 26 ऑगस्टला अचानक कोसळला. या दुर्घटनेमुळं आंतरराष्ट्रीय पातळीवर मान खाली घालावी लागण्याची परिस्थिती निर्माण झाल्याचा दावा करत या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) अभियंत्यांविरुद्ध प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवण्याची मागणी करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांसह असंख्य नेत्यांच्या उपस्थितीत डिसेंबर 2023 मध्ये उभारण्यात आलेला हा पुतळा अवघ्या 9 महिन्यांतच म्हणजे 26 ऑगस्टला कोसळला. त्यामुळं त्याला राज्य सरकार पूर्णतः जबाबदार आहे, असा आरोप याचिकेत करण्यात आला. केतन तिरोडकर यांनी ही फौजदारी जनहित याचिका दाखल केली. हा पुतळा घाईघाईत उभारण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

शिवरायांचा पुतळा कोसळल्यानंतर सार्वजनिक बांधकाम पान 8 वर

# सावंतांचं ऐकण्यापेक्षा सत्तेतून बाहेर पडलेलं बरं

## अजित पवार गटाचा इशारा

**प्रतिनिधी**
**सोलापूर**

"राष्ट्रवादीशी आपलं आयुष्यभर पटलं नाही, मांडीला मांडी लावून बसलोय पण बाहेर आल्यावर उलट्या होतात", वक्तव्य मंत्री तानाजी सावंत यांनी केलं होतं. दरम्यान, तानाजी सावंत यांच्या या वक्तव्यानंतर अजित पवारांची राष्ट्रवादी आक्रमक झाली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून थेट सत्तेतून बाहेर पडण्याचा इशारा देण्यात आलाय.

तानाजी सावंताच्या वक्तव्यानंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादीने जोरदार पलटवार केलाय. तानाजी सावंत जे बोलले ते ऐकून घेण्यापेक्षा सत्तेतून बाहेर पडलेले बरे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी दिली आहे. आम्ही सत्तेसाठी लाचार नाही, महायुतीत राष्ट्रवादी ही तानाजी सावंत यांच्यामुळे नाहीये. उलट महायुती झाली म्हणून आज तानाजी सावंत हे मंत्री झालेत. पण अशा पद्धतीने ते बोलणार असतील तर पक्षनेतृत्वाकडे विनंती करतो की आपण यातून बाहेर पडलेले बरे, असंही उमेश पाटील म्हणाले.

मी हाडामासाचा शिवसैनिक आहे. कधीही आयुष्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादीशी माझं जमलेलं नाही. शिक्षण घेत असल्यापासून आत्तापर्यंत कधीही यांच्याशी जमलं नाही. हे वास्तव आहे. आज जरी कॅबिनेटमध्ये मांडीला मांडी लावून बसलो असलो तरी बाहेर आल्यानंतर उलट्या होतात. ते सहन होत नाही, असंही तानाजी

# गोवा महामार्गाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

**प्रतिनिधी**
**अलिबाग**

मुंबई गोवा महामार्गाचे 14 वर्ष रडत खडत सुरू आहे. 14 वर्षांनंतर पहिल्यांदाच एका ठेकेदार कंपनीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा रायगड पोलिसांनी दाखल केला आहे. इंदापूर ते वडपाले या 26 कि.मी. अंतराच्या महामार्गाच्या चौपदीकरण काम निकृष्ट आणि दर्जाहीन केल्याने अपघातात अनेकांचे प्राण गेल्याचा चेतक इंटरप्राईजेस लिमिटेड आणि अपको इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापकिय संचालक हुकमीचंद जैन, जनरल मैनेजर अवधेश कुमार सिंह, प्रकल्प समन्वयक अभियंता सुजित सदानंद कावळे व नमूद प्रकल्पावर काम करणारे यांच्यावर ठपका ठेवून माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सुजित कावळे याना अटक करण्यात आलेली आहे.

मुंबई गोवा महामार्गाचे रायगड हद्दीतील इंदापूर ते वडपाले या 26 कि.मी. अंतराचा महामार्गाचे चौपदीकरणाचे काम केंद्र शासनाकडून मागविण्यात **पान 8 वर**

# मी एकदा नव्हे अनेकदा माफी मागेन

## महाराज आमचं दैवत, विरोधकांनी राजकारण करू नये

**प्रतिनिधी**
**मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याने आम्हाला वेदना झालेल्या आहेत. ही घटना व्हायला नको होते. परंतु, या घटनेनंतर आम्ही काल बैठक घेऊन दोन समित्या नेमल्या आहेत. जो पुतळा पडला त्याची चौकशी केली जाईल. तर दुसरी समिती ही छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्यदिव्य पुतळा उभारण्याच्या दृष्टीने काम करणार आहे.

मुळात या घटनेवरून कोणीही राजकारण करू नये, शिवरायांच्या पायावर डोकं ठेवून मी एकदा नव्हे अनेकदा माफी मागेन, अशी भावना



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. ते मुंबईत माध्यमांशी संवाद साधत होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, लोकांच्या तीव्र भावना लक्षात ठेवून अजितदादांनी माफी मागितली. शिवाजी महाराज आमचं दैवत आहेत. त्यावर राजकारण होऊ शकत नाही. त्यामुळे कोणीही राजकारण करू नये. आम्ही त्याच ठिकाणी नौदलाच्या मदतीने शिवरायांचा भव्य दिव्य पुतळा उभारणार आहोत, अशी ग्वाही देतो.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, अजितदादा किंवा देवेंद्र फडणवीस असो किंवा मी आम्हाला शिवाजी महाराजांच्या कोणत्याही प्रकरणात राजकारण करायचे नाही. विरोधकांनीदेखील राजकारण करू नये, असे माझे त्यांना आवाहन राहील. मुळात राजकारण करण्यासाठी अनेक विषय आहेत. छत्रपती शिवाजी महाराज आमच्यासाठी राजकीय मुद्दा होऊच शकत नाहीत, असेही ते म्हणाले.

# शिल्पकार जयदीप आपटे RSS चा माणूस

**प्रतिनिधी**
**नागपूर**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गुरुवारी मालवण प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवत हा पुतळा तयार करणारा शिल्पकार जयदीप आपटे हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा माणूस असल्याचा आरोप केला आहे. राजकोट किल्ल्यावरील छत्रपतींचा पुतळा ब्रॉन्झचा होता. पण त्याच्या डोक्याजवळच्या भागात कापूस अन् कागद आढळल्याचा दावाही त्यांनी केला आहे.



नाना पटोले गुरुवारी नागपुरात पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, कोसळलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे हा संघाचा माणूस आहे. त्याला मूर्तीकलेचा कोणताही अनुभव नव्हता. त्यानंतरही त्याला कोणत्या आधारावर छत्रपतींचा पुतळा उभारण्याचे काम देण्यात आले? अशा माणसाला काम देण्याचे कारण काय? महाराजांचा अपमान करण्याचे त्याचे धाडस कसे झाले? शिवरायांचा पुतळा ब्रॉन्झ धातूचा होता. पण त्याच्या डोक्यात कापूस व कागद असल्याचे निदर्शनास आले आहे, असे ते म्हणाले.

# शासकीय नोकरीत जात आडवी आली

**प्रतिनिधी**
**नाशिक**



मी आदिवासी असल्याने जातीची शिकार झाले असून, मला शासकीय नोकरीपासून वंचित ठेवण्यात आले आहे, असा गंभीर आरोप सावरपाडा एक्सप्रेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत यांनी सरकारवर केला आहे. कविताच्या आरोपानंतर आता आदिवासी लोकप्रतिनीधीनींही सरकारला लक्ष्य करायला सुरुवात केली आहे. तर कविता राऊत यांनी केलेल्या आरोपामुळे खळबळ उडाली आहे.

माझ्यासोबत जातीयवाद करून 10 वर्षापासून मला शासकीय नोकरीपासून वंचित ठेवण्यात आले आहे, असा थेट आरोपच राऊत यांनी केला आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पालघरमध्ये

## वाढवण बंदर प्रकल्पाची करणार पायाभरणी

**प्रतिनिधी**
**पालघर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. पालघरमध्ये सुमारे 76 हजार कोटी रुपयांच्या वाढवण बंदर प्रकल्पाची पंतप्रधानांच्या हस्ते पायाभरणी होणार आहे. तसेच पंतप्रधान मोदी सुमारे 1 हजार 560 कोटी रुपयांच्या 218 मत्स्यपालन प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. याबरोबर मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्ट 2024 मध्ये त्यांचे संबोधन असेल.


पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी 11 वाजता, मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये ग्लोबल फिनटेक फेस्ट 2024 ला संबोधित करतील.

**वाढवण बंदराच्या भूमिपूजनाला मच्छीमारांचा तीव्र विरोध, मोदींच्या दौऱ्यावेळी काढणार 'सरकारची प्रेतयात्रा'**

*प्रकल्पामुळं फक्त डहाणू तालुक्यातील मच्छीमारच नाही तर मुंबई, ठाणे, उत्तन, वसई, अर्नाळा, सातपाटी येथील मासेमारी व्यवसायसुद्धा बाधित होणार आहे. याचं कारण म्हणजे समुद्रातील एकूण 30 हजार एकर क्षेत्र मासेमारीसाठी प्रतिबंधित करण्यात येणार असल्याचं भारतीय मत्स्यकी संशोधन संस्थेच्या अहवालामध्ये स्पष्ट नमूद करण्यात आलय.वाढवण किनाऱ्यावर होणाऱ्या सरकारच्या प्रेतयात्रा आंदोलनात मोठ्या संख्येनं मच्छीमार सहभागी होणार आहेत. तसंच वसई येथील मच्छीमार भूमिपूजनाच्या कार्यक्रमाच्या विरोधात वसई तहसील कार्यालयावर मोर्चा काढणार असल्याचंही सांगण्यात आलंय.*

त्यानंतर दुपारी दीड वाजता पालघर येथील सिडको मैदानावर विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते पायाभरणी होत असलेले वाढवण हे भारतातील सर्वात मोठ्या खोल जल बंदरांपैकी एक आहे. हे बंदर भारताची समुद्र कनेक्टिव्हिटी वाढवेल.



# महिलांची छेडछाड करणाऱ्या रिक्षा चालकाला शिवसैनिकांचा चोप

**मुंबई :** विद्याविहार रेल्वे स्थानकाजवळ रिक्षा मध्ये बसून बिभीत्स चाळे व अश्लील हावभाव करणाऱ्या रिक्षाचालकाला महिलांच्या मदतीने पकडून शिवसैनिकांनी चोप देत टिळक नगर पोलिसांच्या ताब्यात दिले.राजावाडी रुग्णालयात येणाऱ्या जाणाऱ्या नर्स, परिचारिका, आयाबाई यांना रेल्वे स्थानकाच्या शेजारी रिक्षात बसून असणाऱ्या या रिक्षा चालकाकडून अश्लील चाळे करून दाखवले जात होते.सदर प्रकार या कर्मचाऱ्यांनी शिवसैनिकांच्या कानावर घातला होता.अखेर काल या घाणेरडे चाळे करणाऱ्या रिक्षाचालकाला महिलांनी पकडून चोप देण्यास सुरुवात केली व शिवसैनिकांना तात्काळ बोलवून घेतले व सदर रिक्षाचालकाला टिळक नगर पोलिसांच्या हवाली केले. यावेळी शिवसेनेचे माजी उपविभागप्रमुख प्रकाश वाणी, प्रसाद कामतेकर, विलास लिगाडे, महादेव राक्षे, सचिन भांगे, अजिंक्य वाणी, सागर सोनावणे, चंद्रकांत हळदणकर, अशपाक अन्सारी आदी उपस्थित होते. यावेळी प्रशासनाकडे रस्त्यावर दिवे व सीसीटीव्ही त्वरित लावण्याची मागणी करण्यात आली आहे.



## थोडक्यात

### आज मुंबई इलेक्ट्रिक वर्कर्स युनियनचा 52 वा वर्धापन दिन

**मुंबई:** बृहन्मुंबई मधील 'बेस्ट' उपक्रम व अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनी आस्थापना मधील वीज पुरवठा कामगारांची श्रमिक संघ अधिनियम १९२६ अन्वये नोंदणीकृत असलेली व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ अन्वये मान्यताप्राप्त प्रातिनिधीक संघटनेचा दर्जा असलेल्या मुंबई इलेक्ट्रिक वर्कर्स युनियनचा ५२ वा वर्धापन दिन सोहळा आज शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ५:३० ते रात्री ९:०० वाजे पर्यंत डॉ. शिरोडकर हॉल, परेल, येथे साजरा होणार आहे. वर्धापन दिन सोहळया मध्ये 'बेस्ट उपक्रमातील व अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनी मधील कामगार व अधिकाऱ्यांच्या मुला/मुलींना सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र व शिष्यवृनी रक्कम देऊन गौरव करण्यात येणार आहे. मनोरंजनासाठी "आनंदयात्री" हा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. बृहन्मुंबईतील कामगार व अधिकारी मोठया प्रमाणात वर्धापन दिन सोहळयास हजर रहाणार आहेत. असे युनियनचे सरचिटणीस विठ्ठलराव गायकवाड (शिवसेना (उबाठा) उप नेते) यांनी आवाहन केले आहे.

### डॉ. आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण

**मुंबई:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एस टी) च्या मध्यवर्ती कार्यालयात, मुंबई सेंट्रल येथे महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्या हस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार विश्व भूषण प. पू. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण आज शुक्रवारी ३० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता तिसऱ्या मजल्यावर करण्यात येणार आहे. कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटनेच्या वतीने गेल्या १५- २० वर्षांपासून ही मागणी करण्यात आली होती. व तिचा पाठपुरावा केला होता एस टी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार डॉ माधव कुसेकर यांनी स्विकारल्यानंतर त्यांना कास्ट्राईब रा प कर्मचारी संघटनेच्या वतीने प्रत्यक्ष भेटून विनंती केली त्यानंतर त्यांनी तातडीने पावले उचलली व अवर मुख्य सचिव यांच्याकडे परिवहन खात्याकडून परवानगी मिळावी यासाठी प्रयत्न केले त्यानंतर परिवहन खात्याने परवानगी दिली तसेच कला संचालक यांनी सुद्धा पुतळा बसविण्यात मान्यता दिली. त्यामुळे हा अर्धपुतळा बसविण्याचा मार्ग मोकळा झाला. ह्या अनावरण समारंभाला सर्व खाते प्रमुख तसेच सर्व संघटना प्रमुख पदाधिकारी यांना रा प प्रशासनाच्या वतीने निमंत्रित करण्यात आले आहे अशी माहिती कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस सुनिल निरभवणे यांनी दिली

# वसईचा गड आमदार हितेंद्र ठाकूरांनीच लढवावा; कार्यकर्त्यांची आग्रही मागणी

प्रतिनिधी
■ वसई

पालघर लोकसभा निवडणुकीत वसई विधानसभा क्षेत्रात बहुजन विकास आघाडीचा झालेला सपशेल पराभव, या विधानसभा क्षेत्रात भाजपच्या जनसंवाद उपक्रमाचा वाढत असलेला प्रचार लक्षात घेता यावेळी वसई विधानसभा क्षेत्रात आमदार हितेंद्र ठाकूर यांच्याशिवाय पर्याय नसल्याने त्यांनीच हा मतदारसंघ लढवावा, अशी आग्रही मागणी बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते करू लागले आहेत. त्यामुळे आमदार हितेंद्र ठाकूर आपल्या राजकीय निवृत्तीवर पुनर्विचार करणार का? असा सवाल उपस्थित झाला आहे.

**आमदार ठाकूर निवृत्तीचा पुनर्विचार करणार?**



मे महिन्यात पालघर लोकसभेसाठी पार पडलेल्या निवडणुकीत वसईसारख्या बालेकिल्ल्यात धुव्वा उडाला. या बालेकिल्ल्यात बविआला कधीच असा पराभव पत्करावा लागला नव्हता. मात्र यावेळेस सन 2009 सालची परिस्थिती आहे; असे राजकीय जाणकारांचे मत आहे. बऱ्याच मतदारांनी यावेळी बविआला साफ झिडकारल्याने या मतदारसंघात बविआने दुसरा उमेदवार दिल्यास त्याची डाळ शिजणार नाही. त्यामुळे या मतदारसंघात आमदार हितेंद्र ठाकूर यांनीच आपली निवृत्ती मागे घेत रणांगणात परतावे, असा आग्रह कार्यकर्ते धरू लागले आहेत.

यावेळेस वसईत बहुजन विकास आघाडीला आव्हानात्मक स्थिती आहे. ख्रिस्ती व मुस्लीम मते तसेच पर्यावरणप्रिय एक मोठा गट बविआपासून दुरावल्याचे चित्र लोकसभेत दिसले. त्याचीच पुनरावृत्ती वसई विधानसभेत होईल अशी शक्यता आहे. त्यामुळे स्वत: आमदार हितेंद्र ठाकूर जरी या रणांगणात निवृत्ती मागे घेत उतरले तरी त्यांच्या उमेदवारीला सुद्धा थोड्या बहुत मतपरिणामांचा सामना करावा लागेल, असा राजकीय अंदाज आहे. याआधी चांगल्या मताधिक्याने आमदार हितेंद्र ठाकूर निवडून आले असले तरी यावेळेस त्यांच्याही मताधिक्यात घट होऊ शकते, असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे. मात्र राजकीय प्रतिष्ठा व बहुजन विकास आघाडीचा बालेकिल्ला हातचा जाऊ न देण्यासाठी बविआलादेखील वसई विधानसभेत सत्वपरिक्षेला सामोरे जावे लागणार आहे.

# भ्रष्ट कारभारामुळे होतेय गावांचे गावपण नष्ट

## परप्रांतीयांची संख्या फुगली; स्थानिकांची परवड

प्रतिनिधी
■ वसई

वसई- विरार शहर महानगरपालिकेची स्थापना होण्यापूर्वी जी गावे (आत्ताच्या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या छत्राखाली असलेली) त्यांच्या हरित सौंदर्यासाठी ओळखली जात होती, ती गावेच काही हापापलेल्या वृत्तींमुळे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. बेसुमार अनधिकृत बांधकामं आणि जंगलांची तोड यामुळे गावांचे गावपण हरवले असून मराठमोळ्या संस्कृतीने नटलेला परिसर गलीच्छ राहणीमान असलेल्या परप्रांतीयांनी काळवंडला आहे. गावांचे गावपण नष्ट करण्यास स्थानिक राजकारणी तसेच प्रशासनातील अधिकारी हातात हात घालून काम करत आहेत.

वसई -विरारच्या पूर्व भागात भूमाफियांनी दिसेल ती जागा स्वस्तात खरेदी करून तसेच काही जागांवर अतिक्रमण करून त्या जागा बळकावल्या आहेत. त्या जागांवर बेकायदेशीर चाळी बांधुन तेथे परप्रांतीय उत्तर भारतीयांना राहण्यास मुभा दिली आहे. या परप्रांतीयांचे सणवार मराठमोळ्या सणांना व संस्कृतीला झाकोळत असल्याने गावांचे गावपण नाहीसे होत चालले आहे. स्थानिक नागरिकदेखील आपल्या जागेत चाळी बांधून या रहीवाशांना राहण्यासाठी जागा भाड्याने देत आहेत. वसई -विरार शहर महानगरपालिक तसेच ग्रामपंचायतींच्या निष्क्रिय कारभारामुळे अनधिकृत बांधकामांचे मायाजाळ येथे उभे राहू लागले आहे. यात प्रामुख्याने चंद्रपाडा ,जुचंद्र,टिवरी, राजावळी, ससूनवघर, मालजीपाडा, पोमण, शिलोत्तर, मोरी, देवदळ, कोल्ही, चिंचोटी, शिरसाड, सातिवली, बापाणे आदी गावांचा समावेश आहे.

वसई पश्चिमेतील नागरिकांनी त्यांच्या जमीनी सांभाळून ठेवल्या, त्यावर शेती कसली. मात्र वसई पूर्वेतील जागामालकांनी आर्थिक हव्यासापोटी ती जागा परप्रांतीयांना विकून टाकली. या जागांवर परप्रांतीयांचे स्तोम वाढत चालले असून त्यांची दादागिरी व गुन्हेगारीत त्यांचा सहभाग वाढत चालला आहे. ज्या गावांचे पूर्वी दाखले दिले जायचे, तीच गावे आज शहरीकरणाच्या मोहजाळात अडकून स्वत:चे गावपण हरवून बसली आहेत.

# विजेच्या खेळखंडोब्यामुळे वसई- विरारमध्ये पाणीबाणी

## नागरिकांचे पाण्याविना हाल

प्रतिनिधी
■ वसई

वसई- विरार शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पाणीपुरवठा प्लाण्टवर चार दिवस वीज खंडित झाल्याने वसई- विरार शहरात पाणीबाणी निर्माण झाली आहे. त्यामुळे वसई- विरारकरांनापाण्यासाठी टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. सध्या मुसळधार पावसामुळे धरणे काठोकाठ भरली आहेत. मात्र तरीही विजेच्या खेळखंडोब्यामुळे वसई- विरारकरांना पाण्यासाठी टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे.

वसई -विरार शहर महानगरपालिकेला पाणी पुरवठा करणाऱ्या सूर्या-धामणी व कडवास या धरण क्षेत्रात सध्या मुसळधार पावसामुळे सोसाट्याचा वारा सुरू आहे. तसेच धरणातील पाणी शुद्धीकरण करणाऱ्या मासवण व धुकटन येथे देखील सोसाट्याच्या वाऱ्यामुळे विजपुरवठा खंडित करण्यात आला होता . त्यामुळे पाणी पुरवठ्यात व्यत्यय येऊन वसईकरांना पाण्यासाठी टाहो फोडावा लागत आहे. गेल्या दोन-चार दिवसांत वसईतील सोसायट्यांत पाणीबाणी निर्माण झाल्याने त्यांच्यात वादाचे प्रसंग उद्भवत आहेत.

धरणांत काठोकाठ पाणीसाठा असताना केवळ विज पुरवठा खंडित असल्याने नागरिकांना पाण्यासाठी टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. टँकरच्या महागड्या पाण्यावर अवलंबून राहण्याची वेळ आल्याने सोसायट्याना आर्थिक फटका सोसावा लागत आहे.



*मुंबई: महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वांद्रे पश्चिम विधानसभा मार्फत दहीहंडी उत्सव २०२४ मोठ्या उत्साहात पार पाडला. वांद्रे येथील मानाची दहीहंडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दहीहंडीचे आयोजन तुषार माधव आफळे (विभाग अध्यक्ष) यांनी केल होते. याप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित राज ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी वांद्रे पश्चिम विधानसभेतील सर्व पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

# पिस्तुलच्या धाकाने दरोडा टाकणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला अटक

■ वसई

पिस्टल आणि धारदार शस्त्राच्या धाकाने वसईतील कुरीयर सर्व्हीस च्या कार्यालयावर दरोडा टाकणा-या आंतरराज्यीय टोळीला अटक करण्याची कामगिरी माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखने केली आहे.

माणिकपुर-येथील दिवाण टॉवरमध्ये असलेल्या कुरियर सर्व्हीस च्या कार्यालयावर पाच जणांच्या टोळीने बुधवारी दुपारी दरोडा टाकला होता.या फिल्मी स्टाईल दरोड्यात कंपनीचे मालक सिध्दराज राजपूत यांच्या डोक्याला पिस्टल आणि चॉपर लावून "चिल्लाया तो तेरेको ठोक डालेगा,असे धमकावत दरोडेखोरांनी त्यांचे हात पाय बांधले.त्यानंतर त्यांच्या ऑफिसमधील ७३ हजार ७०० रुपये,दोन मोबाईल,डीव्हीआर घेवून ते पसार झाले.या दरोड्याची माहिती मिळाल्यावर माणिकपुर पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत गुन्हा नोंद केला.

या दरोड्याचा तपास करण्यासाठी माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखेने १०० हून अधिक ठिकाणचे सी.सी. टी.व्ही कॅमेरे तपासले.तसेच तांत्रिक विश्लेषण केल्यावर दरोडेखोर संतोषभुवन,नालासोपारा पूर्व येथे असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यामुळे तात्काळ सापळा रचून गुन्हे प्रकटीकरण पथकाने अजय मंडल, शंकर गौडा आणि विजयसिंग ठाकूर यांना अटक केली.त्यांना पोलीसी खाक्या दाखवल्यावर उर्वरीत साथीदार मोहम्मद जुबेर नुरमोहम्मद शेख आणि लालमणी यादव यांच्याही पोलीसांनी मुसक्या आवळल्या.या टोळीकडून ३ लाख १४ हजार,८०० अटोमॅटिक पिस्टल, ८ जिवंत काडतुसे,कार,चॉपर, चाकु,कटर मशिन,स्क्रु ड्रायव्हर,पक्कड,हातोडी,चाव्या,मोबाईल फोन जप्त करण्यात आले.

अटकनंतर त्यांच्याकडून नालासोपारा,कोळसेवाडी-कल्याण,कुर्ला रेल्वे आणि दावनगेरे-कर्नाटक येथील गुन्हे उघड करण्यात गुन्हे शाखेला यश आले आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे उपनिरिक्षक सनिल पाटील, सागर साबळे, हवालदार शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे,धनंजय चौधरी, गोविंद लवटे,आनंदा गडदे, प्रविण कांदे,पुजा कांबळे,भालचंद्र बागुल,अमोल बड़े,मोहन खंडवी यांनी ही कामगिरी केली.

# परप्रांतीय मजुराचा चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

प्रतिनिधी
■ जव्हार

जव्हार तालुक्यातील एका आदिवासी समाजाच्या ५ वर्षीय मुलीवर एका परप्रांतीय मजुराकडून लैंगिक अत्याचार करण्यात आला. याबाबत सविस्तर वृत्तांत असा की, जव्हार तालुक्यातील ओझर या ठिकाणी कमा राझंड यांच्या शेतामध्ये बीएसएनएल कंपनीचे टॉवर उभारणीचे काम सुरू असून हे टॉवर उभारण्यासाठी युपी वरून १) ईस्तीयाक जुमराती अंसारी २) अब्दुल सलाम हमीद अली अंसारी ३) शेकु एहसान आली ४) बनवारीलाल भारतीया ५) ममीतकुमार हरजंन ६) ईमतीताज अन्वरअली अंसारी अशे ६ परप्रांतीय मजूर कामासाठी आले होते, त्यांना राहण्यासाठी पिडीत मुलीच्या वडीलांनी शेतावरील



घराशेजारी असलेल्या पडवी मध्ये दि .२६/८/२०२४ रोजी जागा दिली होती. ते झोपडीत राहून आपले जेवण बनवीत होते दिनांक २८ ऑगस्ट २०२४ रोजी चार मजूर टॉवरचे काम करीत होते, तर एक जण झोपडी मध्ये जेवण बनवत होता. त्यावेळी इस्तियाक जुमराती अन्सारी वय वर्ष १९ रा. लेहटी पो. उर्वा तालुका मेजा जि. प्रयागराज राज्य युपी याने पिडीत मुलीचे आई वडील शेतावर काम करत असल्याचा गैरफायदा घेत झोपडीच्या बाजूला खेळत असलेल्या मुलीला खाऊचे आमीश दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. मुलीचे आई-वडील संध्याकाळी ५ वाजता शेतावरून परत आल्यानंतर मुलीला आंघोळ घालताना मुलगी रडत असल्यामुळे झालेला प्रकार तिच्या आईच्या लक्षात आला, तिने मुलीला विचारले असता कामावरील भैय्या ने केलेला प्रकार तिने आईला सांगितला. तिच्या आईने घडलेला प्रकार सदर मुलीच्या वडीलांना सांगितला वडील यांचा जाब विचारण्यासाठी टॉवरच्या कामावर गेले असता परप्रांतीय मजुरांनी तेथुन पळ काढला.

सदर मुलीच्या आईने तिला चालतवड येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले तेथील डॉक्टरांनी प्रथमोपचार करून तिला जव्हार ग्रामीण रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविले, रुग्णालयात जाण्यापूर्वी मुलीच्या आई वडिलांनी रात्री जव्हार पोलीस स्टेशन गाठले, जव्हार पोलिसांनी तिला उपचारासाठी पतंगशहा रुग्णालयात भरती करुन जाब जबाब घेऊन प्रथम दर्शनी मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे आढळल्याने, मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी इस्तियाक जुमराती अन्सारी याला पळुन जाताना मोखाडा तालुक्यात नागरीकांच्या मदतीने पकडून अटक केले असून, त्याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम 64, 65 ,65( 2 ) सह पोस्को कलम 4, 8 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचे तीव्र पडसाद जव्हार तालुक्यात उमटले असून जव्हारच्या साकीनाका येथील आदिवासी चौकात या घटनेचा जाहीर निषेध नागरिकांतर्फे करण्यात आला. यावेळी सदर आरोपीवर अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात आली. निषेधाच्या वेळी उपस्थित महिलांनी लाडकी बहीण योजना आम्हाला नको परंतु सुरक्षित बहीण योजना राबवा अशी मागणी सरकारकडे केली आहे.

# कवाडा ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकांची दादागिरी

## सरपंचाच्या सांगण्यावरून फाडला पंचायतीचा ठराव !

प्रतिनिधी
■ मुंबई

ग्रामपंचायत कवाडा येथे दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी ग्रामसभा घेण्यात आली होती. ग्रामसभेत कवाडा येथील रहिवासी राहुल विजय खरपडे यांनी आदिवासी विकास कामासाठी सिमेंट कॉंक्रिट रस्त्याची मागणी ग्रामसभेत केली. या मागणीचे ठराव घेण्यासाठी आज दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी ग्रामपंचायत कार्यालय कवाडा येथे ते गेले असता ठरावाची कॉपी ग्राम विकास अधिकारी दीपक भुरकुड याने सरपंच दर्शना बोदले यांच्या सांगण्यावरून फाडून टाकले. कवाडा गावामध्ये याविषयी संतापाचे वातावरण तयार झाले आहे. राजकारण करण्यासाठी विकास कामाविषयी सरपंच मनमानी कारभार करत आहे. तसेच शासनाचे अधिकारी ही सरकारी दस्तऐवज फाडून बेजबाबदार पणे वागत आहेत. याची तक्रार राहुल खरपडे यांनी पंचायत समिती तलासरी येथे केली आहे.

# आज मुंबईतील खासगी अनुदानित शाळांतील शिक्षकांचा विविध मागण्यांसाठी धडक मोर्चा

## शिक्षकेतर कर्मचारीही सहभागी होणार

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिका क्षेत्रातील मान्यताप्राप्त अनुदानित खासगी शाळांमध्ये शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन, विमा आदी लाभ देण्यात यावेत, अशा एकूण 16 प्रलंबित मागण्यांची तड लावण्यासाठी आज शुक्रवारी (30 ऑगस्ट) करी रोड येथे पालिका शिक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढला जाणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षक- शिक्षकेतर सेनेच्या वतीने हे आंदोलन केले जाणार आहे. पालिका मान्यताप्राप्त खासगी अनुदानित शाळांतील हजारो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या या मागण्या वर्षांनुवर्षे प्रलंबित आहेत.शिक्षक सेनेचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक के.पी .नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा धडक मोर्चा निघणार आहे. यात खासगी अनुदानित शाळांतील हजारो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होणार आहेत. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना घेराव घालण्याचा इशारा देण्यात आला आहे.

याबाबत शिक्षक सेनेचे अध्यक्ष नाईक यांनी सांगितले की, " मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पालिका शिक्षण विभागाच्या मान्यतेने कार्यरत असलेल्या खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे वर्षानुवर्ष प्रलंबित आहेत. प्रशासन वेळोवेळी आश्वासनां पलीकडे काहीही न देता कर्मचाऱ्यांच्या तोंडावर बोळा फिरवण्याचे काम करीत असल्याने शिक्षण विभागाविषयी कर्मचाऱ्यांच्या मनात प्रचंड असंतोष खदखदत आहे. तो असंतोष या मोर्चातून व्यक्त होणार आहे." अनेक खाजगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षक, लिपिक, शिपाई ही पदे वर्षानुवर्ष रिक्त आहेत. त्याचे गंभीर परिणाम अध्ययन-अध्यापन प्रक्रिवर होत आहेत. परंतु ही पदे भरण्याबाबत प्रशासन चालढकल करीत असल्याचा आरोप नाईक यांनी केला आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

**जौनपुर को. ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई**

(रजि. नं.: एम.यु.एम. / डब्ल्यु. पी. / आर. एस. आर. सी. आर. ९३५२/२००२-०३)
नोंदणी कार्यालय शॉप नं. ८९०, प्रेमनगर रहिवाशी सुधार संघ, उन्नतनगर रोड, गोरेगांव (प.) मुंबई - ४०० १०४.
फोन : ०९६१९५३७३५३

**२१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते कि, संस्थेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १५/०९/२०२४ रोजी दुपारी ठिक २.०० वाजता केशव गोरे स्मारक ट्रस्ट, सुभाष नगर, तीन डोंगरी ए-१ बेकरी, गोरेगांव (प.) मुंबई ४००१०४ येथे खालील विषयावर चर्चा करण्याकरिता आयोजित करण्यात आली आहे. तरी या सभेस संस्थेच्या सर्व सभासदानी उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) दि. १३/०८/२०२३ रोजी झालेल्या २० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२) दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल, ताळेबं व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
३) सन २०२३ - २०२४ सालच्या वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल सादर करणे व मंजुरी देणे.
४) संस्थेच्या सन २०२२-२०२३ सालाच्या वैधानिक लेखापरिक्षण दोष-दुरुस्ती व त्यावरिल निबंधकाचे निर्देश सादर करणे.
५) सन २०२४ - २०२५ सालाकरिता करिता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे
६) सन २०२४- २०२५ चे अंदाजपत्रक संमत करणे.
७) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
८) पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.
९) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २४ ए अन्वये सभासदांना सहकार प्रशिक्षण देणे.
१०) मा. अध्यक्षांच्या परवागीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे
११) आभार व समारोप

**ठिकाण : गोरेगांव (प.), मुंबई - १०४.**
**दिनांक : २९/०८/२०२४**

**सही**
**भुल्लन आर. यादव-**
उपाध्यक्ष
संचालक मंडळाच्यावतीने

**विशेष सूचना**

१) सदर सभा गणसंस्थेअभवी सभा तहकुब झाल्यास अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा होईल. अशा सभेस गणसंस्थेचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांचे राहण्याचे व कामाचे पत्ते व फोन नंबर बदलले असतील तर कार्यालयात लेखी कळवावे.
३) कोणत्याही सभासदास सूचना मांडवयाच्या असल्यास त्या सभेच्या चार दिवस अगोदर संस्थेस लेखी मिळतील अशा कळवाव्यात.
४) ज्या सभासदांनी भाग दाखले घेतले नसतील त्यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयातून घेऊन जावे.

**शिवशक्ती नागरी सहकारी क्रेडिट सोसायटी लि., मुंबई**

(रजि. नं.: बी. ओ. एम. / डब्ल्यू- पी. आर. एस. आर. / (सी.आर.) / ११००/१९८६-८७)
प्रशासकीय कार्यालय : शॉप नं. ८, एफ विंग, ग्राऊंड फ्लोअर, सुमित समर्थ आर्केड, आरे रोड, जैन मंदिर जवळ, गोरेगांव (प.) मुंबई - ४०० १०४. दुरध्वनी क्र. ०२२ ६२३६०६८२

**३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**शिवशक्ती नागरी सहकारी क्रेडिट सोसायटी लि. मुंबई**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते कि, संस्थेची ३७वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १५/०९/२०२४ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता केशव गोरे स्मारक ट्रस्ट, सुभाष नगर, तीन डोंगरी ए-१ बेकरी, गोरेगांव (प.) मुंबई ४००१०४ येथे खालील विषयावर चर्चा करण्याकरिता आयोजित करण्यात आली आहे. तरी या सभेस संस्थेच्या सर्व सभासदानी उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) दि. १३/०८/२०२३ रोजी झालेल्या ३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२) संचालक मंडळाने सादर केलेला दि. ३१/०३/२०२४ पर्यंतच्या कार्याचा अहवाल ताळेबंद पत्रक व त्या सालाच्या नफा-तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३) संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२३-२०२४ या वर्षाच्या नफा विभागाणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
४) संस्थेच्या सन २०२३ - २०२४सालाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करुन तो स्विकृत करणे.
५) सन २०२३-२०२४ मधील अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देऊन त्यामधील ज्यादा खर्चास मान्यता देणे व सन २०२४- २०२५ सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६) सन २०२४-२०२५ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व त्यांचा मेहताना ठरविणे.
७) सन २०२४-२०२५ सालाकरिता अंतर्गत व कर लेकापरिक्षक यांची नेमणुक करणे व त्यांचा मेहताना ठरविणे.
८) संचालक मंडळ सदस्य व नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
९) सन २०२२ - २०२३ चा लेखापरिक्षण दोष- दुरुस्ती आहवाल व त्यावरिल निबंधकाचे निर्देश सादर करणे.
१०) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २४ए अन्वये सभासदांना सहकार प्रशिक्षण देणे.
११) मा. अध्यक्षांच्या परवानगिने एनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.
(१२) आभार व समारोप.

**ठिकाण : गोरेगांव (प.), मुंबई - १०४.**
**दिनांक : २९/०८/२०२४**

**सही**
**अजितसिंह यादव**
व्यवस्थापक
संचालक मंडळाच्यावतीने

**विशेष सूचना**

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास त्याच ठिकाणी वरिल विषयांवर चर्चा करण्यासाठी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात यावी.. त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
२) ज्या सभासदांना ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रकाबाबत लेखी सुचना कळवायच्या असल्यास सभेच्या ४ दिवस अगोदर कार्यालयात आणुन द्याव्यात.
३) ज्या सभासदांनी आपला राहण्याचा व कामाचा पत्ता, मोबाईल क्रमांक बदला संबधी माहिती संस्थेस लेखी करण्यात यावी.
४) ज्या सभासदांनी भाग प्रमाणपत्र लाभांश घेतला नसेल, त्यांनी तो कार्यालयात येवून कार्यालयीन वेळेत घेवून जाणे.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 71**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ७१**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई: सिंधुदुर्ग येथील राजकोट किल्ल्यात उभारलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक केवळ ८ महिन्यात कोसळले या घटनेचा तीव्र निषेध म्हणून ईशान्य मुंबई विभाग क्रं. ०८ च्यावतीने बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज चौक, अमृतनगर, घाटकोपर पश्चिम येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसेना ईशान्य मुंबई विभाग प्रमुख सुरेश पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विभागसंघटिका सौ.प्रज्ञाताई सकपाळ व मानखुर्द-शिवाजी नगर या तीनही विधानसभेचे सर्व महिला, पुरुष उपविभागप्रमुख, विधानसभाप्रमुख, वि.संघटक, वि.समन्वयक, वि. निरीक्षक, मा.नगरसेवक/नगरसेविका, वि.सहसंघटक, वि.सहसमन्वयक, उपविभाग समन्वयक, शाखाप्रमुख, शाखा समन्वयक, युवासेना युवक/युवती सर्व पदाधिकारी ,विभागातील शिवप्रेमी नागरिक, शिवसैनिक, युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.*



## ‘महारेरा’चे संकेतस्थळ राहणार दोन दिवस बंद

**मुंबई:** ‘महारेरा’चे नवीन संकेतस्थळ १ सप्टेंबरपासून कार्यान्वित करण्यात येणार आहे. नवीन संकेतस्थळ कार्यान्वित करण्यासाठी जुन्या संकेतस्थळावरील सर्व माहिती नवीन संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ‘महारेरा’ने ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शुक्रवार आणि शनिवारी सध्याचे संकेतस्थळ बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन दिवसांमध्ये विकासक, तक्रारदार, दलाल वा नागरिकांना कोणतीही प्रक्रिया करता येणार नाही. त्यामुळे या कालावधीत सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन या निमित्ताने ‘महारेरा’कडून करण्यात आले आहे. सर्व सामान्यांसाठी ‘महारेरा’चे संकेतस्थळ अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. नोंदणीपासून तक्रारीच्या निकालापर्यंतची सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येते. त्यातच आता दोन दिवस ‘महारेरा’चे संकेतस्थळ बंद राहणार आहे. जुन्या संकेतस्थळात अनेक बदल करून ‘महारेरा’ने नवीन संकेतस्थळ तयार केले आहे. ‘महाकृती’ नावाने हे संकेतस्थळ ओळखले जाणार आहे. नवीन संकेतस्थळ १ सप्टेंबरपासून कार्यान्वित होणार आहे.

# निवडणुकीसाठी काँग्रेसकडे चेहरा नाही, उद्धव ठाकरेंना मिळणार त्याचा पुरेपूर लाभ

### बच्चू कडूंचे स्पष्ट मत, ठाकरेंबाबत केले मोठे भाकीत

प्रतिनिधी
■ मुंबई

काँग्रेसकडे महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी सध्या प्रभावी चेहरा नाही, त्याचा पुरेपूर फायदा उद्धव ठाकरे यांना होत आहे, असे परखड वक्तव्य प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आणि माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी केले आहे. मुस्लीम मतदार पुन्हा विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्याकडेच वळतील, असं मोठं भाकितही बच्चू कडू यांनी वर्तवलं. त्यांनी एका दैनिकाच्या वेबपोर्टलसोबत विशेष संवाद साधताना अनेक विषयांवर भाष्य केले.

काँग्रेसकडे राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी सध्या प्रभावी चेहरा नाही, त्याचा पुरेपूर फायदा उद्धव ठाकरेंना होतोय. लोकसभा निवडणुकीच्या वेळी मुस्लीम समाजाची मते ठाकरेंनी घेतली होती, विधानसभेतही तेच चित्र राहील,



मुस्लीम पुन्हा ठाकरेंकडेच वळतील, असा अंदाज बच्चू कडू यांनी वर्तवला आहे.

काँग्रेसचे हक्काचा मतदार ठाकरे गटाकडे वळतोय हे चित्र लोकसभा निवडणुकीच्या वेळी पाहायला मिळालं. महाविकास आघाडी न झाल्यास काँग्रेसचा मतदार ठाकरेंकडे गेलेला असेल, असं सांगतानाच काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांची महाविकास आघाडी एकत्र लढली, तरी फायदा उद्धव ठाकरेंनाच होईल, असं मतही बच्चू कडू यांनी व्यक्त केले

**_छत्रपती संभाजीनगरमध्ये मत विभाजन_**

*लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा स्ट्राईक रेट काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीपेक्षा कमी होता, त्यामुळे जागा वाटपात अडचणी येणार, असे बच्चू कडू म्हणाले. छत्रपती संभाजीनगर येथील मुस्लीम मते एमआयएमला गेल्यामुळे महायुतीची जागा आली, असे सांगत मुस्लीम मतदारांचे ठाकरे शिवसेना आणि एमआयएममध्ये विभाजन झाल्याचे कडू यांनी सुचवले. महाविकास आघाडीने मुस्लिम समाजाच्या भूमिकेचा फायदा घेतला, भाजपला त्याचाच फटका बसला. सध्या पक्ष आणि नेते मोठे होत आहेत, पण देशाची परिस्थिती ढासळत चालली आहे, असे मत बच्चू कडू यांनी व्यक्त केले. लोकसभा निवडणुकांच्या वेळी पाहायला मिळालेला ट्रेंड कायम राहू शकतो, पण विधानसभेत मते तुलनेने कमी असतात, त्यामुळे फरक दिसेल, असा अंदाजही कडू यांनी वर्तवला.*

# राज्यातील पालिका कामगारांचे प्रश्न धसास लावण्यासाठी आझाद मैदानात धरणे आंदोलन

प्रतिनिधी
■ मुंबई




महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदेमध्ये काम करणारे कंत्राटी, रोजंदारी, बहुउद्देशीय आणि कायम कामगारांचे प्रश्न धसास लावण्यासाठी बुधवारी महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदेमध्ये काम करणारे सर्व कामगार आझाद मैदान येथे धरणे धरून बसले होते. या धरणे आंदोलनाचे नेतृत्व फडरेशनचे अध्यक्ष बबनराव झिंजुर्डे, कार्याध्यक्ष अशोक जाधव, प्रमुख सरचिटणीस गणेश शिंगे, सरचिटणीस शब्बीर विद्रोही, प्रवक्ता गौतम खरात आणि सर्व महापालिका-नगरपालिकेमध्ये वेगवेगळया संघटनांचे अध्यक्ष, सरचिटणीस यांनी केले. फेडरेशनच्यावतीने मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले.

कंत्राटी, रोजंदारी, बहुउद्देशीय कामगारांना कायम करा, राज्यातील 'ड' संवर्ग म.न.पा. कर्मचाऱ्यांच्या मासीक वेतनावर कर्मचाऱ्यांच्या वेतनाप्रमाणे १००% वेतन अनुदान म्हणून ग्रा. राज्यातील म.न.पा. न.पा. कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करा., राज्यातील म.न.पा. न.पा. कर्मचाऱ्यांना १०, २०, ३० ची आश्वासीत प्रगती योजना लागू करा., सर्व कंत्राटी कामगारांना ८.३३% सानुग्रह अनुदान द्या., महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका नगरपालिकांमधील काम करणाऱ्या सर्व जातीच्या कामगारांना लाड-पागे समितीच्या शिफारसी लागू करा. पुणे, पिंपरी, चिंचवड व इतर महानगरपालिका नगरपालिका अंतर्गत परिवहन व्यवस्थेमधील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम तात्काळ द्या. अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

आझाद मैदान येथील धरणे कार्यक्रमाला शरद पवार अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष), उध्दव ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख (उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष) आणि नाना पटोले काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांनी धरणे आंदोलनाला भेट देऊन आपले सर्व प्रश्न लवकरच सोडविण्यात येतील असे आश्वासन दिले. मोर्चामध्ये महापालिकेमध्ये सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांपैकी अध्यक्ष बबनराव झिंजुर्डे, कार्याध्यक्ष अशोक जाधव, प्रमुख सरचिटणीस श्री. गणेश शिंगे, सरचिटणीस शब्बीर विद्रोही, प्रवक्ता गौतम खरात आणि सर्व महापालिके-नगरपालिकेमध्ये वेगवेगळया संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. त्यांनी ही मोर्चाला मार्गदर्शन केले.

# केंद्रीय मंत्रीपदी तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल आठवले यांचा 3 सप्टेंबर रोजी मुंबईत सत्कार

प्रतिनिधी
■ मुंबई

भारत सरकारमध्ये सलग तिसऱ्यांदा केंद्रीयराज्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांचा मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षातर्फे येत्या मंगळवार दि.3 सप्टेंबर 2024 रोजी सायंकाळी 5 वाजता मुंबईत षणमुखानंद हॉल सायन येथे भव्य सत्कार सोहळा आयोजीत करण्यात आला आहे अशी माहिती रिपब्लिकन पक्षा तर्फे आज मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजीत पत्रकार परिषदेत देण्यात आली.या पत्रकार परिषदेस रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनावने आणि मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे,कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड आणि सरचिटणिस विवेक पवार उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या भव्य सत्कार सोहळयास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार,, माजी खासदार राहुल शेवाळे,भाजप मुंबई अध्यक्ष आशिष शेलार,माजी मंत्री महादेव जानकर,माजीमंत्री सदाभाऊ खोत,आमदार प्रविण दरेकर,आमदार प्रसाद लाड आमदार विनय कोरे उपस्थित राहणार असल्याची माहिती या सत्कार सोहळयाचे अध्यक्ष रिपाइं चे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे यांनी दिली आहे. केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या सत्कार सोहळयास रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रिपब्लिकन पक्षातर्फे करण्यात आले आहे.

# मुंबई शहरातील दुसऱ्या टप्प्यातील सिमेंट काँक्रिट रोडला मान्यता

■ मुंबई

मुंबईत 1624 कोटी रुपये खर्चून 65 किलोमीटर लांबीचे 295 रस्ते सिमेंट काँक्रीटने बांधण्यात येणार आहेत. मुंबईतील रस्त्यांचा प्रलंबित प्रश्न आता मार्गी लागला आहे. उपनगरातील दुसऱ्या टप्प्यातील सीसी रस्त्यांच्या कामासाठी महापालिकेने गेल्या महिन्यात कंत्राटदारांची नियुक्ती केली होती. मुंबईतील दुसऱ्या टप्प्यात बांधण्यात येणाऱ्या सीसी रस्त्यांसाठी कंत्राटदार नेमण्याच्या प्रस्तावाला महापालिका ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात मंजुरी मिळणार आहे. दुसऱ्या टप्प्यात शहरातील 65 किमी लांबीचे 295 रस्ते बांधले जाणार आहेत.

एकूण 2050 किमीचे रस्ते मुंबई महापालिकेच्या अंतर्गत येतात. पहिल्या टप्प्यात उपनगरातील २५५ किलोमीटरचे रस्ते सिमेंट काँक्रीटने बांधण्यात आले आहेत. त्यापैकी ५४० किमीचे रस्ते नगर विभागांतर्गत येतात. मुंबईतील 53 टक्के रस्ते हे डांबरी आणि पेव्हर ब्लॉकचे आहेत. या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे. पावसा दरम्यान या रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगर विभागाच्या रस्त्यांच्या कामासाठी दोन वर्षांपासून महापालिकेला कंत्राटदार मिळत नव्हते. कंत्राटदार सापडल्यावर त्याने कामही सुरू केले नाही. त्यामुळे महापालिकेने त्यांच्यावर कारवाई करत 65 कोटींचा दंड ठोठावला आणि ठेकाही रद्द केला होता.

पालिकेच्या अंदाजित रकमेपेक्षा 868 कोटी रुपयांनी जादा असलेल्या ठेकेदाराकडून 2010 कोटी रुपयांची बोली लावण्यात आली. मात्र, पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठेकेदारासोबत घेतलेल्या बैठकीत हे काम 1624 कोटी 68 लाख 89 हजार 484 रुपयांचे करण्याचे ठरले. ठेकेदाराला पावसाळा सोडून रस्त्यांचे बांधकाम 24 महिन्यांत पूर्ण करावे लागणार आहे.



***मुंबई : बंदर व गोदी कामगारांचा दिल्लीत चांगला समझोता करार केल्याबद्दल द्विपक्षीय वेतन समितीचे सदस्य सुधाकर अपराज , विद्याधर राणे व केरसी पारेख यांचा मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियन व ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियनचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विमानतळावर शाल व पुष्पहार घालून भव्य स्वागत केले.***

# आज मुंबईत पायाभूत प्रकल्पांवर परिषद अनिलकुमार गायकवाड यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी
■ मुंबई

पायाभूत प्रकल्पांच्या आधारे महाराष्ट्राचा चौफेर विकास होत असताना मुंबईत आज शुक्रवारी ३० ऑगस्ट २०२४ रोजी पायाभूत प्रकल्पांवर एका परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक अनिलकुमार गायकवाड यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

मुंबई सेंट्रल येथील हॉटेल साहील मध्ये सकाळी ११.०० वा सुरु होणा-या या परिषदेचे थीम आहेः ‘पायाभूत प्रकल्पः चौफेर प्रगतीचा संकल्प.’ याच विषयावर गायकवाड आपल्या उद्घाटनपर भाषणात पहिले पुष्प गुंफणार आहेत. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे हे याप्रसंगी सन्माननिय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेत १)पायाभूत प्रकल्प आणि ग्रामीण विकास- डॉ. दिलीप पांढरपट्टे, सदस्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोग. २) पायाभूत प्रकल्पांचे कृषी विकासाशी नाते - प्रकाशभाऊ पोहरे कृषीतज्ञ, संपादक दैनिक देशोन्नती ३) पायाभूत प्रकल्पात माध्यमांचा सहभाग- देवेंद्र भुजबळ माजी संचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य. हे वक्ते बोलणार आहेत.

शिवनेर व लाईफ रिटेल या संस्थांनी या परिषदेचे आयोजन केले असून यू ट्यूब व फेसबुकवर या परिषदेचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

## कुर्ला शितल तलावात पडून एकाचा मृत्यू

**मुंबई:** बुधवारी मध्यरात्री १२.३८ वा. कुर्ला पश्चिम येथील एल. बी.एस मार्गावर असलेल्या शितल तलावात पडून एकाचा मृत्यू झाला आहे.मृत व्यक्तीचे नाव रमेश बहादूर सरपेसिंग बडेला. वय ४० वर्षे असल्याचे सांगण्यात आले. शितल तलावात एक व्यक्ती पडल्याची माहिती अग्निशमन नियंत्रण कक्षाला प्राप्त होताच सदर व्यक्तीस अग्निशमन दलाने एन. डी. आर. एफ.पथकाच्या मदतीने बाहेर काढून त्यास स्थानिक पोलिसांच्या सहाय्याने राजावाडी रुग्णालय येथे नेले असता, तेथील कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकारी डॉ. शितल यांनी काल सायंकाळी ४.१० वा. मृत घोषित केले.गुरूवारी मुंबईत फारसा पाऊस पडलेला नसताना तसेच वाऱ्याचा वेगही नियंत्रणात असताना फांदया / झाडे पडण्याच्या तक्रारी पालिकेच्या आपत्कालीन विभागाला प्राप्त झाल्या. शहरात ५, पूर्व उपनगरात १ व पश्चिम उपनगरात ७ अशा एकूण १३ ठिकाणी फांदया/झाडे पडण्याच्या तक्रारी नागरीकांकडून प्राप्त झाल्या. यात कुणाला दुखापत झाली नसल्याचे सांगण्यात आले.

# गुंड हेमंत नायर विरोधात बेकायदेशीर कब्जा आणि हल्ल्यासाठी जनहित याचिका दाखल

■ मुंबई

लोखंडवाला येथील रहिवाशांनी हेमंत नायर यांच्या विरोधात जनहित याचिका (पीआयएल 17/2024) दाखल केली आहे. नायर यांच्यावर बेकायदेशीरपणे सार्वजनिक उद्यानाचे गुरुद्वारात रूपांतर केल्याचा आरोप आहे आणि त्यांनी तेथे विवाह, खानपान यांसारखे व्यवसाय सुरू केले आहेत. या घटनेमुळे स्थानिक समाजात संतापाची लाट उसळली असून लोक नायरला कुख्यात गुंड मानतात. नायर ने न्यायालयाचे आदेश आणि सार्वजनिक सुरक्षिततेची कोणती पर्वा केली नाही. नायर यांच्याकडे बेकायदेशीर कृती आणि कायदेशीर सूचनांकडे दुर्लक्ष झाल्याची प्रदीर्घ नोंद आहे. सार्वजनिक जमिनीवर बांधलेली बेकायदा बांधकामे हटवण्याचे निर्देश न्यायालयाच्या आदेशानंतरही नायर यांनी दडपशाहीने अतिक्रमण करणे सुरूच ठेवले. त्याच्या अलीकडील गुन्ह्यांमध्ये किंग्स्टन सीएचएसमध्ये अतिक्रमण करणे आणि रहिवाशावर प्राणघातक हल्ला केला आहे,यात पीडितेचे बरगड्या तुटल्या आहे. या घटनेनंतर ओशिवरा पोलीस ठाण्यात एफआयआर (क्रमांक ०८९१/२०२४) नोंदवण्यात आला असून नायर अद्यापही फरार आहे. हेमंत नायरच्या विरोधात धैर्याने उभे राहिलेल्या जनहित याचिकाकर्त्यालाही सूडाचा सामना करावा लागला आहे. नायरने कथितरित्या त्यांचे सामुदायिक क्लब सदस्यत्व रद्द केले, नायर विरोधात अन्य प्रकरणाची चौकशी सुरू आहे. सेलिब्रेशन स्पोर्ट्स क्लबमधील फसवणूक आणि खोटारडे (एफआयआर क्र. एमईआरसी १/२०१७) चे आरोप आणि एमसीजीएम द्वारे खारफुटीचा नाश आणि जमिनीवर अतिक्रमण केल्याबद्दल एफआयआर (क्रमांक 99/13) दाखल आहे.लोखंडवाला येथील रहिवाशांनी हेमंत नायर यांच्यावर तातडीने आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.


# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

मुख्य प्रशासकिय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर ४२९००३
दुरध्वनी क्र. ०२५१२७२०९९६ विस्तार क्र. २०४ फॅक्स क्र. ०२५९२७२०१०४ संकेतस्थळ: www.umcgov.com

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना.

**-: प्रेसनोट :-**

**दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ रोजी दुपारी ०३:०० वाजता महासभा सभागृह, उल्हासनगर -३ येथे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षणार्थी यांचेकरिता मेळाव्याचे आयोजन केले आहे. सदर मेळाव्यास जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थी यांनी उपस्थित राहून योजनेचा लाभ घ्यावे.**

**-: योजनेचे स्वरुप :-**

- मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने करीता 5 हजार 500 कोटींची तरतूद
- उमेदवाराचे वय 18 ते 35 वर्ष या वयोगटातील असावे
- शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे व विविध क्षेत्रातील प्रकल्प, उद्योग, स्टार्टअप्स, आस्थापनांनी आवश्यक मनुष्यबळाची मागणी ऑनलाईन नोंदविणे गरजेचे
- कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) कालावधी सहा महिने राहील
- उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत 12 वी उत्तीर्ण- रु.6 हजार, आय. टी. आय व पदविका उत्तीर्ण- रु.8 हजार, पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण रु. 10 हजार दरमहा विद्यावेतन मिळणार
- उदयोगक्षेत्रात प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे (इंटर्नशिप) उमेदवारांना रोजगारक्षम करून उद्योगाकरिता कुशल मनुष्यबळ तयार करणार
- प्रत्येक आर्थिक वर्षात 10 लाख कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) च्या संधी उपलब्ध होणार
- प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी 1 व शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी 1 असे एकूण 50 हजार योजनादूत नेमणार
- इच्छुक उमेदवारांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक
- उल्हासनगर महानगरपालिकेत मर्यादित जागा असल्याने प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. तरी कृपया नोंद घ्यावी.

**संपर्क कार्यालय :-**
सामान्य प्रशासन विभाग, २ रा मजला, मुख्य इमारत, उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर – ४२१००३ दुरध्वनी क्रमांक : ०२५१२७२०११६

सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर - ३
जा. क्र. उमपा/ पीआरओ / ३३५/२०२४
दिनांक:-२९/८/२०२४

सही/-
(जमीर लेंगरेकर )
अतिरिक्त आयुक्त (१)
उल्हासनगर महानगरपालिका


# मनपा एल विभागात कुकर खरेदी घोटाळा नसीम खान यांनी घेतली आयुक्तांची भेट

### सखोल चौकशी करून कार्यवाही करण्याचे मनपा आयुक्तांचे आश्वासन

प्रतिनिधी
■ मुंबई



मुंबई महानगरपलिकेच्या कुर्ला एल विभागात कुकर खरेदीत घोटाळा झाला आहे. या संदर्भात माजी मंत्री व प्रदेश काँग्रेस कार्याध्यक्ष मो आरिफ (नसीम) खान यांनी काल पालिका मुख्यालयात पालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेऊन या कुकर घोटाळ्याची चौकशी करून पोलीसांमार्फत दोषीवर गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्याची मागणी केली.

मुंबईत 36 विधानसभा आणि अ ते टी अशा 24 मनपा विभाग कार्यालये असून कोणत्याही मनपा क्षेत्रात ही योजना सुरू नाही मग कोणत्या आधारावर फक्त मनपा एल विभागातच ही योजना सुरू आहे? महत्वाचे म्हणजे, मनपा एल विभागात कुर्ला, कालिना आणि चांदिवली ह्या तीन विधानसभा येत असताना फक्त चांदिवली विधानसभेतच मोफत प्रेशर कुकर वितरित करण्यामागे नेमका हेतु काय आहे? तसेच 500 रुपये किमतीचा कुकर 2500 रुपयांमध्ये विकत घेण्यामागे मनपा एल विभाग सहायक पालिका आयुक्त धनाजी हेरलेकर यांनी स्थानिक आमदारांशी हात मिळवणी करून मोठा भ्रष्टाचार केल्याचे नसीम खान यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले. याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

यावर मनपा आयुक्त भूषण गगराणी यांनी मनपाची मोफत प्रेशर कुकर वाटण्याची कोणतीही योजना नाही आणि अशाप्रकारचा भ्रष्टाचार मनपा एल विभागात झाला असेल तर नक्कीच या प्रकरणाची सखोल चौकशी करून पोलिस ठाण्यामार्फत गुन्हा दाखल करून लवकरच दोषीवर कार्यवाही करण्याचे आश्वासन मनपा आयुक्तांनी या वेळी दिले. असे नसेल खान यांनी सांगितले.

सर्वोत्कृष्ट बनायचे असेल तर सामान्यांकडून सहसा टाळल्या जाणाऱ्या असामान्य गोष्टी आत्मसात करायला हव्यात.



- मायकल फेल्प्स
अमेरिकन जलतरणपटू

वृत्तमानस
मुंबई, शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४

# पेंशन त्यांच्या हक्काची...

गेल्या काही दिवसांपासून जुन्या आणि नव्या पेन्शन योजनेवरून वादाची ठिणगी पडली होती. कोणत्या पद्धतीने निवृतिवेतन मिळावे यावरून अनेक मते व्यक्त केली जात होती. केंद्रीय आणि राज्यातील शासकीय सेवेतील कर्मचारी जुनी निवृत्तिवेतन योजना पूर्ववत सुरू करण्याची मागणी करीत असताना केंद्र सरकारने एकीकृत निवृत्तिवेतन योजना आणण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी केंद्राने राष्ट्रीय पेन्शन योजना लागू केली आहे. त्याला विरोध झाल्यानंतर आता नवीन योजनेचा पर्याय कर्मचाऱ्यांसमोर ठेवला असल्याने या वादाची झळ कमी होऊ शकते. २००४ मध्ये माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारनं जुन्या पेन्शन योजनेऐवजी नवी नॅशनल पेन्शन सिस्टीम लागू केली. त्यावेळेस निश्चित पेन्शनची तरतूद रद्द करण्यात आली होती. याचबरोबर नव्या नॅशनल पेन्शन सिस्टीममध्ये कर्मचाऱ्यांकडून दरमहा काही रक्कम जमा करणे बंधनकारक करण्यात आले. यामध्ये कर्मचारी आणि सरकारकडून समान रक्कम म्हणजे १० टक्के योगदान देण्याची तरतूद करण्यात आली. त्यानंतर २०१९ मध्ये योगदानाची रक्कम मूळ वेतन आणि डीएच्या १४ टक्के करण्यात आली. नव्या तरतुदीनुसार निवृत्तीनंतर एकूण रकमेच्या ६० टक्के रक्कम कर्मचारी काढू शकतात. तर उर्वरित ४० टक्के रक्कमेची गुंतवणूक सार्वजनिक क्षेत्रातील बँका, वित्तीय संस्था आणि खासगी कंपन्यांकडून प्रमोट करण्यात आलेल्या पेन्शन फंड व्यवस्थापकांच्या विविध योजनांमध्ये करण्यास बंधनकारक करण्यात आल्याने कर्मचारी संघटनांनी त्याला विरोध दर्शविला होता. या कंपन्यांकडून देण्यात आलेल्या योजनांची किमानपासून कमाल जोखमीच्या पर्यायाच्या आधारे निवड केली जाऊ शकते, असा आरोप केला गेला आहे. यासंदर्भात सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनांचं म्हणणं आहे की, नवीन योजना लागू करताना ती ओपीएसपेक्षा अधिक चांगली असल्याचे सांगण्यात आलं होतं. मात्र २००४ नंतर भरती झालेले जे कर्मचारी निवृत्त होत आहेत त्यांना फार थोडी पेन्शन मिळणार असल्याने ती योग्य नाही. याशिवाय कर्मचाऱ्यांना यामध्ये योगदान म्हणजे रक्कमदेखील जमा करावी लागते आहे. त्याउलट ओपीएसमध्ये पेन्शन हे सरकारकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या सामाजिक सुरक्षा योजनेवर पूर्णपणे अवलंबून होतं. म्हणजेच पेन्शनची पूर्ण रक्कम सरकारकडून दिली जात होती. कर्मचाऱ्यांचं म्हणणं आहे की, जी नवी योजना आणण्यात आली आहे. त्यामध्ये कर्मचाऱ्यांकडून दिलं जाणारं योगदान (रक्कम) काढण्यासंदर्भात स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. जुनी पेन्शन योजनेअंतर्गत सरकार २००४च्या आधी सरकारी नोकरीत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना एक निश्चित निवृत्तिवेतन देत होते. हे वेतन कर्मचाऱ्याचा निवृत्त होत असतानाचा पगार किती होता, त्यावर अवलंबून होते. या योजनेनुसार निवृत्त झालेल्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्या व्यक्तीच्या कुटुंबालाही हे निवृत्तिवेतन मिळत होते. मात्र या योजनेत फेरबदल करण्यात आले आणि १ एप्रिल २००४ पासून राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना सुरू करण्यात आली. जुन्या पेन्शन योजनेनुसार निवृत्तीच्या वेळी कर्मचाऱ्याचा जितका पगार होता त्याच्या निम्मा पगार त्या कर्मचाऱ्याला पेन्शन म्हणून मिळत होता. जर एखाद्या व्यक्तीचा सरकारी नोकरीतून निवृत्त होतानाचा पगार एक लाख रुपये असेल तर त्याचे निवृत्तीनंतरचे निवृत्तिवेतन हे ५० हजार रुपये इतके होते. निवृत्त कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबालाही पेन्शन दिले जात होते. या पेन्शनमधून कुठल्याही प्रकारची कपात केली जात नव्हती. कर्मचारी निवृत्त झाल्यावर त्याला वैद्यकीय खर्च आणि भत्ता आदी सुविधा दिली जात होती. या योजनेच्या अंतर्गत कर्मचाऱ्याला २० लाख रुपयांपर्यंतची ग्रॅच्युइटी दिली जात होती. एनपीएसनुसार सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारातून १० टक्के रक्कम कपात केली जाते. या निवृत्तिवेतन योजनेत निवृत्तीनंतर नेमके किती निवृत्तिवेतन मिळणार याची रक्कम निश्चित नसते, असे सांगण्यात येते. जुन्या निवृत्तिवेतन योजनेत निवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन हे सरकारी तिजोरीतून केले जात होते, तर एनपीस योजनेत ते शेअर बाजारावर अवलंबून आहे. एनपीएसमध्ये सहा महिन्यांनी मिळणाऱ्या महागाई भत्त्याची तरतूद नाही. या कारणांमुळेच सरकारी कर्मचारी एनपीएस नको तर जुनी निवृत्तिवेतन योजना हवी, ही मागणी जोर धरत आहे. जुन्या पेन्शन योजनेनुसार निवृत्तीच्या वेळी कर्मचाऱ्याचा जितका पगार होता त्याच्या निम्मा पगार त्या कर्मचाऱ्याला निवृत्तिवेतन म्हणून मिळत होता. तर एकीकृत निवृत्तिवेतन योजनेत निवृत्तीपूर्वीच्या नोकरीच्या शेवटच्या १२ महिन्यांच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम निवृत्तिवेतन म्हणून दिली जाईल. जुन्या योजनेनुसार निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला हे निवृत्तिवेतन दिले जात होते. या पेन्शनमधून कुठल्याही प्रकारची कपात केली जात नाही. एकीकृत योजनेनुसार एखाद्या निवृत्तिवेतनधारकाचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला कर्मचाऱ्याच्या मृत्यूपर्यंत मिळालेल्या निवृत्तिवेतनापैकी ६० टक्के रक्कम मिळेल. जुन्या पेन्शन योजनेनुसार कर्मचारी निवृत्त झाल्यावरही त्या कर्मचाऱ्याला वैद्यकीय भत्ता आणि मेडिकल बिल रिम्बर्समेंटची सुविधा दिली जात होती. या योजनेच्या अंतर्गत कर्मचाऱ्याला २० लाखांपर्यंतची ग्रॅच्युईटी दिली जात होती. एकीकृत या बाबींचा समावेश नसल्याचा कर्मचारी संघटनांचा आरोप आहे. एकीकृत निवृत्तिवेतन योजनेत (यूपीएस) कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तिवेतन निश्चित केले आहे. एखाद्या कर्मचाऱ्याने किमान २५ वर्षे काम केले असेल, तर निवृत्तीपूर्वीच्या नोकरीच्या शेवटच्या १२ महिन्यांच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम निवृत्तिवेतन म्हणून दिली जाईल. जर एखाद्या निवृत्त कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला मृत्यूपर्यंत मिळालेल्या निवृत्तिवेतनापैकी ६० टक्के रक्कम मिळेल. एखाद्या कर्मचाऱ्याने १० वर्षांनंतर नोकरी सोडल्यास त्याला १० हजार रुपये निवृत्तिवेतन दिले जाईल. कर्मचाऱ्यांना यापूर्वी सुरू झालेल्या राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना (एनपीएस) किंवा यूपीएस यापैकी एक पर्याय निवडावा लागेल. निवृत्तिवेतनात सध्या कर्मचाऱ्यांचा १० टक्के वाटा आहे, तर केंद्र सरकारचा १४ टक्के हिस्सा आहे. आता यूपीएसमध्ये केंद्र सरकारचा १८ टक्के हिस्सा असेल. या योजनेत कर्मचाऱ्यांचे वेतन कपात केले जाणार नाही. ही योजना १ एप्रिल २०२५ पासून लागू होणार आहे. या योजनेबाबत अजूनही स्पष्टता नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण पाहावयास मिळते. त्यामुळे जुन्या पेन्शन योजनेत कोणताही बदल न करता ती लागू करण्यात यावी, अशी मागणी बहुतांश कर्मचारी संघटनांनी सरकारकडे केली होती. आम्ही या गोष्टीवर भर देत चर्चा करण्याची मागणी केली होती. मात्र त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. नवीन योजनेनुसार शेअर बाजारातील चढ-उताराच्या आधारे गुंतवलेल्या रकमेवर जो परतावा मिळेल त्याच प्रमाणात कर्मचाऱ्याला पेन्शन मिळणार होते. ही रक्कम निश्चित असू शकते आणि बदलणारीही असल्याने त्याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. अनेक आरोप झाल्यावर यूपीएसमध्ये एनपीसीएमधील काही त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने केला आहे. परंतु अजूनही वेतन निश्चितीचा कालावधी आणि दर सहा महिन्याला मिळणारा महागाई भत्ता, ग्रॅज्युईटी, वैद्यकीय सुविधा भत्ता व निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूपश्चात कुटुंबाला मिळणाऱ्या पेन्शनमध्ये कपात करण्याच्या मुद्द्यांवर काही कर्मचारी संघटनांचा आक्षेप आहे. त्यामुळे केंद्र सरकारने जुन्या निवृत्तिवेतनाला छेद देण्यासाठी सुधारित योजना आणली तरी अनेक प्रश्न कायम आहेत. आगामी काळात या वादावर सरकार कसा तोडगा काढणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. कारण पेन्शन योजनेकडे सेवानिवृत्त झालेले कुटुंब फार आशेने पाहत असतात. आयुष्यभर सेवा करून निवृत्त आणि त्यानंतर मृत्यू झाल्यास त्याचे कुटुंब वाऱ्यावर येऊ नये, त्याला त्याच्या मृत्यूनंतर सुध्दा लागावा अशी भावनिक नाळ या योजनेशी जुळलेली आहे. त्यामुळे सरकारला ती त्याच भावनेतून हाताळावी लागणार आहे.

# वृतपत्र लेखन एक कला, एक छंद...

**पत्रलेखनाशी** प्रत्येकाचा संबंध शालेय जीवनापासूनच येतो. आईला पत्र , बाबांना पत्र इत्यादी विषयांवर पत्रलेखनाची सुरवात होते. त्यानंतर प्रियकर , प्रेयसी यांना पत्र लिहिली जातात. शिक्षण पूर्ण झाल्या नंतर नोकरीसाठी अर्ज लिहिले जातात , तो सुध्दा पत्राचाच एक प्रकार आहे. यावरून पत्रलेखनाचा आपल्या जीवनाशी किती घनिष्ठ संबंध आहे हे दिसून येते. पत्रलेखन सर्वानाच जमते असे नाही. कारण ती एक जशी कला आहे तसेच शास्त्र आहे. अनेक जागृत वाचक आपली मतं , आपले विचार निरनिराळ्या दैनिकांत मांडत असतात.त्यांना वृतपत्रलेखक म्हणतात. बातमीदार अथवा पत्रकार बनणे सर्वांनाच शक्य नाही परंतु , पत्रलेखनाद्वारे आपली मतं वृतपत्रात मांडणे सर्वांनाच शक्य आहे. जवळजवळ सर्व वृतपत्रात संपादकीयच्या बाजूला वाचकांच्या पत्रव्यवहारासाठी खास जागा राखून ठेवलेली असते त्यात वाचक आपली मते मांडू शकतात.

## पत्राचे स्वरुप

१) स्थानिक तक्रारी -- काही वृतपत्रलेखक कचऱ्याचे ढीग , तुंबलेली गटारे , एस.टी. संदर्भातील तक्रारी इत्यादी तक्रारी बाबत सातत्याने पत्रलेखन करत असतात.

२ ) सूचना करणारी - काही वृत्तपत्र लेखक धोकादायक वळणे , धोकादायक इमारती , स्पीड ब्रेकर इत्यादी बाबत सूचनां करणारी पत्र पाठवतात.

३ ) संपादकांची खुशामत करणारी पत्र - काही पत्रलेखक संपादकांच्या अग्रलेखाबाबत स्तुती करणारी पत्र लिहितात अर्थात सर्व संपादकांना अशी पत्र आवडत नाहीत. वाचकही अशी पत्र वाचत नाहीत.

४ ) प्रतिक्रियात्मक पत्र - आंतराष्ट्रीय , राष्ट्रीय अथवा स्थानिक धोरणाबाबत जागृत वृतपत्रलेखक त्वरित आपली प्रतिक्रिया देतात.त्याच प्रमाणे शैक्षणिक , सांस्कृतिक , धार्मिक , सामाजिक , शासकीय प्रश्नांबाबत अनेक अभ्यासू वृतपत्रलेखक आपल्या प्रतिक्रिया पत्राद्वारे देत असतात.

## वृत्तपत्र लेखकांसाठी आचारसंहिता

सध्या पत्र पोस्टाने पाठवण्यापेक्षा ईमेलद्वारे पाठवले जाते.हे कमी खर्चाचे तर आहेच परंतु काही सेकंदात पोहोचते.सध्या अनेकांकडे अत्याधुनिक मोबाईल असल्याने अनेक जण मोबाईलद्वारे पत्र टाईप करून पाठवत आहेत. त्यामुळे पूर्वीपेक्षा सध्या दैनिकांकडे पात्रांचा ओघ वाढला आहे. मर्यादित जागेत जास्तीत जास्त पत्र प्रकाशित करायची असतील तर संबंधित संपादक खालील मुद्यांवर पत्राची निवड करतात.

१) पत्र कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय देणारे असावे.शब्दांचा फापटपसारा टाळावा.

२) मेल करताना विषय या ओळीत "वाचकांचा पत्रव्यवहार" अथवा त्या दैनिकाने ठरवलेले नांव टाकावे.उदा.जनमनाचा कानोसा , लोकमानस , वृत्तमानस इत्यादी. असे केल्याने पत्र योग्य त्या विभागाकडे जाते.

३) पत्राला सुयोग्य शिर्षक द्यावे.उदाहरणार्थ अयोग्य अथवा धोकादायक स्पीडब्रेकर बद्दल पत्र असेल तर त्याला " स्पीडब्रेकर की बोनब्रेकर " .

४) पत्राच्या शेवटी आपला पत्ता व मोबाईल नंबर द्यावा.पत्र निनावी पाठवू नये.

५) पत्र योग्य की अयोग्य आहे हे ठरवण्याचा तसेच छापण्याचा अधिकार संपादकांचा असतो.त्यामुळे पत्र छापून न आल्यास त्यांना फोन करू नये अथवा स्मरणपत्र पाठवू नये.

६) काही जण एका दैनिकातील पत्र दुसऱ्या दैनिकांत स्वतःच्या नावाने पाठवतात हे "पत्रचौर्य" आहे. ते योग्य नाही.

७) नुसत्या तक्रारी करण्यापेक्षा पर्याय सुचवावेत. रेल्वेच्या कडेला असलेल्या मोकळ्या जागेत पूर्वी भाजीपाला पिकवला जात असे परंतु तो बाजूला असलेल्या सांडपाण्याने धुतला जात असे त्यामुळे तो आरोग्यास अपायकारक आहे.त्याऐवजी फूलबाग करा अशी सूचना आल्यामुळे रेल्वेने त्वरित त्याची दखल घेतली.

८) पत्र छापून आल्यानंतर ती सूचना अथवा तक्रार संभदित खात्याकडे पाठवावी. प्रत्येक जिल्ह्यात माहिती अधिकारी असतात ते शक्यतो अशा बातम्या अथवा पत्र संबंधित खात्याकडे पाठवतात.जर पत्रलेखकांनी एक प्रत त्यांना पाठवली तर त्यांचे काम सोपे होईल.

वृतपत्र लेखकांनी अखंड वाचन केले व मुद्देसूद लेखन केले तर त्यांची जास्तीत जास्त पत्र प्रकाशित होतील.तसेच त्यांनी केलेल्या सुचना व तक्रारी यांचा पाठपुरावा केला तर त्यांना मानसन्मान प्राप्त होईल.हा छंद कोणत्याही वेळात सुरू करता येईल.शक्यतो ज्येष्ठ नागरिकांनी या छंदाद्वारे समाजसेवा करावी ही अपेक्षा.

**- दिलीप प्रभाकर गडकरी,** कर्जत

# महाराष्ट्र : जागतिक दर्जाचे लॉजिस्टिक हब

**भारतातील** आघाडीचे राज्य म्हणून महाराष्ट्राचा नावलौकीक आहे. भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये (जीडीपी) राज्याचे योगदान सुमारे 14 टक्के असून देशाच्या आर्थिक वाढीमध्ये महाराष्ट्र राज्य हे निर्णायक भूमिका बजावत आहे. महाराष्ट्राने सन 2028 पर्यंत $ 1 ट्रिलियन जीडीपी गाठण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, देशाच्या $ 5 ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या निर्धारित लक्ष्यात महाराष्ट्र 20 टक्के योगदान देणार आहे. महाराष्ट्र राज्य हे उच्च सकल राज्य देशांतर्गत उत्पादनासह भारतातील सर्वात औद्योगिक राज्य म्हणून अग्रेसर आहे. महाराष्ट्र हे देशाच्या एकूण मूल्यवर्धित दरामध्ये 15.1 टक्के योगदान देऊन राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे.



महाराष्ट्र हे भारतातील दुसरे सर्वात मोठे निर्यातदार राज्य आहे. सन 2022-23 या आर्थिक वर्षामध्ये युएसडी 23 अब्ज इतक्या निर्यातीसह देशाच्या एकूण निर्यातीमध्ये राज्याचा 17 टक्के वाटा आहे. महाराष्ट्रातून यूएसए, यूएई, हाँगकाँग, बेल्जियम, यूके, चीन, सिंगापूर इत्यादी देशांमध्ये प्रामुख्याने निर्यात केली जाते. सन 2022-23 या आर्थिक वर्षामध्ये राज्याने थेट परकीय गुंतवणुकीमध्ये (FDI) आपले सर्वोच्च स्थान कायम ठेवले आहे. एप्रिल 2022 ते मार्च 2023 या कालावधीदरम्यान महाराष्ट्रात एकूण रु. 1,18,422/- कोटी इतके एफडीआय प्राप्त झाले आहे. जे देशातील एकूण परकीय गुंतवणूकीच्या 29 टक्के इतके आहे. सन 2028 पर्यंत $ 1 ट्रिलियन अर्थव्यवस्था साध्य करण्याच्या उद्दिष्टाच्या पूरक कार्यवाही अंतर्गत राज्य नवीन उद्योग, औद्योगिक उद्याने आणि समर्पित कॉरिडॉरच्या स्थापनेला सक्रियपणे प्रोत्साहन देत आहे.

सध्या भारतातील लॉजिस्टिक क्षेत्राचा भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये 14 टक्के वाटा आहे. लॉजिस्टिक क्षेत्र 2.2 कोटी लोकांना रोजगार पुरवते. देशामध्ये वार्षिक 4.6 अब्ज टन उत्पादनाची वाहतूक व हाताळणी याकरिता रु. 9.5 लाख कोटीं इतका खर्च येतो. महाराष्ट्राचा यामध्ये मोठा वाटा असून, राज्यात 17,757 किमी लांबीचे राष्ट्रीय महामार्ग व 28,461 किमी लांबीच्या राज्य महामार्गासह राज्यामध्ये पायाभूत सुविधांचे विस्तीर्ण जाळे आहे. तसेच राज्यामध्ये 11,631 किमीचे रेल्वेचे जाळे असून त्याअंतर्गत 548 रेल्वे गुड्स शेड्सचा समावेश आहे. सागरी आणि हवाई जोडणी अंतर्गत राज्यामध्ये दोन मोठी व 48 लहान बंदरे, 53 आंतरदेशीय कन्टेनर डेपो आणि कन्टेनर फ्रेट स्टेशन, आठ खासगी माल वाहतूक टर्मिनल आणि 11 एअर कार्गो टर्मिनल्स या सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. राज्यामध्ये 2.23 एमएमटीपीए इतकी गोदाम क्षमता, 1.03 एमटीपीए इतकी शीतगृह सुविधा आणि 1320 दशलक्ष टनची शिपींग पोर्टची क्षमता आहे. कौशल्य विकासाकरिता राज्यामध्ये 116 पेक्षा अधिक लॉजिस्टिक प्रशिक्षण केंद्रे आहेत.

देशातील लॉजिस्टिकवर होणारा खर्च कमी करण्याकरिता प्रभावी धोरणात्मक हस्तक्षेप महत्वाचे असून बहुविध वाहतूक व्यवस्था, उत्कृष्ट दर्जाचे रस्ते आणि बंदर पायाभूत सुविधा, वितरण, वाहतूक आणि साठवण यांच्याशी संबंधित कामांमध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा वापर या बाबी लॉजिस्टीक खर्च कमी करण्यास सहाय्यभूत ठरणार आहे. देशभरात लॉजिस्टिक परिसंस्था सुधारण्यासाठी विविध उपक्रम घेतले जात असून, त्यात केंद्र शासनाच्या पीएम गती शक्ती 2021 व नॅशनल लॉजिस्टीक पॉलीसी-2022 इत्यादी उपक्रमांचा समावेश आहे.

राज्यामध्ये कार्यक्षम एकात्मिक लॉजिस्टिक पायाभूत सुविधेच्या निर्मितीद्वारे स्थानिक लॉजिस्टीक उद्योगांच्या स्पर्धात्मकतेमध्ये वाढ करुन तसेच लॉजिस्टीकचा वेळ आणि खर्च कमी करण्यावर भर देऊन, महाराष्ट्राला जागतिक दर्जाचे लॉजिस्टिक हब आणि आघाडीचे केंद्र म्हणून स्थापित करण्याचा या शासनाचा मानस आहे. सन 2028 पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था $ 1 ट्रिलियन एवढी साध्य करण्याकरीता उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. तसेच राज्याचे सन 2028 पर्यंत $ 1 ट्रिलियन अर्थव्यवस्था गाठण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात लॉजिस्टीक धोरण महत्वपूर्ण भूमिका बजावणार आहे.

पुढील 10 वर्षातील विकासाला समोर ठेवून राज्याचे लॉजिस्टीक धोरण-2024 तयार करण्यात आले आहे. राज्यामध्ये लॉजिस्टीक क्षेत्रातील पायाभूत सुविधांची निर्मीती व बळकटीकरण करणे, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान व शाश्वत उपक्रमाचा प्रसार करणे, लॉजिस्टीक पार्क विकासकांसाठी प्रोत्साहन, लॉजिस्टीक क्षेत्रातील एकल घटकांना प्रोत्साहन, लॉजिस्टीक सुविधांकरिता संस्थात्मक उभारणी करणे, कौशल्य विकास आणि क्षमता निर्माण करणे, लॉजिस्टीक क्षेत्राच्या उपक्रमांसाठी व्यवसाय सुलभता (Ease of Doing Business) तसेच लॉजिस्टीक क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या घटकांसाठी राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या इतर धोरणांचे अभिसरण करणे, या बाबींवर विशेष भर देण्यासाठी राज्याचे लॉजिस्टीक धोरण -2024 तयार करण्यात आले आहे.

'महाराष्ट्र लॉजिस्टीक धोरण-2024' अंतर्गत राज्यात 10 हजार एकरहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी 25 जिल्हा लॉजिस्टीक नोड्स (प्रत्येकी 100 एकर), 5 प्रादेशिक लॉजिस्टीक हब (प्रत्येकी 300 एकर), 5 राज्य लॉजिस्टीक हब (प्रत्येकी 500 एकर), 1 नॅशनल लॉजिस्टीक मेगा हब (1500 एकर) व 1 आंतरराष्ट्रीय लॉजिस्टीक मेगा हब (2000 एकर) विकसित करण्यात येईल. लॉजिस्टीक नोडस तसेच लॉजिस्टीक हबच्या पायाभूत सुविधा प्रकल्प राबविण्याकरिता (कार्यक्रम खर्च) रु. 7 हजार कोटी तसेच लघु, मोठे, विशाल, अतिविशाल, एकात्मिक ट्रक टर्मिनल्सकरिता (अनिवार्य खर्च) भांडवली अनुदानासाठी रु. 635 कोटी तसेच एकल घटकांना व्याज दर अनुदान व तंत्रज्ञान सहाय्यसाठी द्यावयाच्या प्रोत्साहनांकरिता (अनिवार्य खर्च) रु. 675 कोटी, धोरणाच्या अंमलबजावणीसाठी धोरण कालावधीत एकूण रु. 8310 कोटी एवढी तरतूद उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या धोरणाअंतर्गत येणाऱ्या बहुमजली, लघु, मोठे, विशाल, अतिविशाल लॉजिस्टीक पार्क यासह एकल/स्वतंत्र घटकांना धोरणात नमूद केलेल्या बिगर वित्तिय प्रोत्साहन देय करण्याकरीता मान्यता सुद्धा देण्यात येईल. व्यवसाय सुलभतेच्या दृष्टीने लॉजिस्टीक क्षेत्रातील एमएसएमईंना जमिनीची किंमत वगळून रु.50 कोटी मर्यादेपर्यंत स्थिर भांडवली गुंतवणूक मर्यादा असणाऱ्या घटकांना कोणत्याही प्रकारच्या पूर्व परवानगीपासून सूट देण्यास मान्यता प्रदान करण्यात येईल. सन 2024-25 ते 2025-26 या आर्थिक वर्षात आवश्यक भूसंपादन / पायाभूत सुविधांसाठीचा खर्च महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येईल. उर्वरीत धोरण कालावधीसाठी आवश्यक वित्तीय तरतूद राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

**- संजय डी.ओरके**
विभागीय संपर्क अधिकारी

# पत्र मानस

## आत्महत्याचे राज्य

विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होण्यात महाराष्ट्र आघाडीवर असून एकूण आत्महत्येच्या १४ टक्के आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत. या आत्महत्या लोकसंख्या आणि शेतक-यांच्या आत्महत्येच्या संख्येपेक्षाही अधिक असल्याचे राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारीवरुन स्पष्ट होत आहे. या आत्महत्या वाढण्यास शासन व समाज जबाबदार आहेत.कर्जात बुडालेले शेतकरी ,शिक्षणाच्या बोजाखाली व व्यसनाधीन असलेले विद्यार्थी ,पिडित महिला आत्महत्या करीत आहेत.त्या आत्महत्या रोखण्यास राज्य सरकारला अपयश आलेले आहे. कृषी संकट, सामाजिक आणि हवामान परिस्थिती आणि सरकारी धोरणातील अपयश यांसह अनेक कारणे या समस्येला कारणीभूत आहेत.विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांचे प्रमाण पाहता सध्या समाजात सुरू असलेली जीवघेणी स्पर्धाच याला कारणीभूत असल्याचे दिसून येते. स्वतःची हानी करण्याची मानसिकता झालेल्या विद्यार्थ्यांना ओळखून त्यांचे समुपदेशन करावे लागेल. आत्महत्या रोखण्यासाठी पिडितामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची गरज आहे.

**- विवेक तवटे, ठाणे**

## महाराजांच्या शौर्याची प्रतारणा करण्यास कारणीभूत कोण

सिंधुदुर्ग येथील अलिकडेच बांधलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा २६ ऑगस्ट २०२४ रोजी कोसळून पडल्याने भारतासह महाराष्टाची अस्मिता धुळीस मिळाली.बातमी वाचून धस्स झाले. महाराजांचा पुतळा कोसळल्याने जगभरात महाराष्ट्राची पर्याने मराठी माणसाची नाचक्की झाली.मुख्यमंत्री म्हणतात समुद्र किनारी वार्याचा वेग ताशी ४५ किलोमीटर होता म्हणून पुतळा पडला.शिक्षण मंत्री म्हणतात पुढे काही चांगले घडणार असेल. सरकारनेच आठ महिन्यात पुतळा उभारून दैदीप्यमान यश मिळवले आहे.म्हणून घटनेचे गांभीर्य ओळखून राजीनामा द्यावा. महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधानांनी केले. नौदलाने पुतळ्यासंबंधिचे सोपस्कार पूर्ण केले असतील. पुतळा बनवणारा शिल्पकार तेवढाच पारंगत असणार म्हणून त्याला कंत्राट दिले.पुतळा बनविण्यास अडीच- तीन वर्षाचा कालावधी लागतो.शिल्पकाराने शासनाच्या अटी व शर्तीचे पालन केले की नाही हे पाहण्याची जबाबदारी शासनाची आहे.शिल्पकाराने कोणते निकष लावून आठ महिन्यात २८ फुट उंच पुतळा उभा केला.त्याने या आधी किती राष्ट्रपुरूषांचे पुतळे उभारले आहेत हे नौदलाने पडताळले असेल.छत्रपतींनी आपल्या कारकीर्दीत अनेक गड किल्ले बांधले ते चारशे वर्षानंतर ही शाबूत आहेत. उभ्या जगाला ज्यांच्या अद्वितीय शौर्याचा आजही कायम हेवा वाटतो ते हिंदवी स्वराज्य संस्थापक रयतेचे राजे बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या असामान्य पराक्रमाची ,शौर्याची,गनिमीकावा,युद्ध रणनिती, जिद्द, चिकाटी,ध्येय,दूरद्रुष्टी,,द्रष्टेपणा,दुर्दम्य इच्छाशक्ती, प्रजाप्रेम,सर्वधर्म समभाव, प्रजाहितदक्षवृत्ती,न्याय, नितिशास्त्र,कर्तव्य कठोरता इत्यादी गुणदशांसह त्याच्या अभ्यद्ध स्थापत्य शैलीची साडेतीनशे वर्षे उलटूनही साक्ष देणारे सह्याद्रीच्या अतिदुर्गम कडेकपारीत आणि अत्त्युच्च गगनभेदी डोंगर रांगेतील गड किल्ले आजही ताठ मानेने महाराजांच्या अद्वितीय पराक्रमाची आणि इतिहासाची साक्ष देत उभे आहेत. सरकारचे अपयश,बेजबाबदारपणा ,भ्रष्टाचार की तंत्रज्ञानाचा अभाव यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आठ महिन्यात कोसळून पडला ? याचे दु:ख महाराजांना दैवत माणनार्यां प्रत्येकाच्या मनात आहे.

**- महादेव गोळवसकर, मुंबई**

## नागरिकांना घाबरणारे दंडाचे फलक काढा!

शासकीय तसेच मुंबई महानगरपालिकेच्या विविध कार्यालयात गेल्याबरोबर कायद्याच्या दंडाचे फलक दृष्टीस पडतात. या फलकांमुळे आपल्या समस्या तसेच इतर कामे घेऊन येणाऱ्यांच्या मनात दहशत व भीती निर्माण होते. त्यामुळे नागरिक अधिकाऱ्यांच्या दालनात जाण्यास घाबरतात. लोक विविध कामांसाठी शासकीय कार्यालयात येत असतात. वारंवार चकरा मारुनही अधिकारी न भेटल्यास,कामास विलंब झाल्यास त्यांचा त्रागा होणं शक्य आहे. त्यामुळे चिडून जोरात बोलल्यास अथवा अधिकाऱ्याच्या दालनात विनापरवानगी घुसल्यास त्यांच्यावर कारवाई करणे योग्य नाही. कायदा तोडणे अथवा असभ्यवर्तन केल्याचे कोणीही समर्थन करीत नाही. मात्र नागरिकांना घाबरण्याचा प्रकार पालिका कार्यालयात लावण्यात आलेले हे फलक करित आहेत. दंडाचे हे फलक प्रशासनाने त्वरीत काढावेत, जेणेकरुन नागरिकांना आपले प्रश्न अधिकाऱ्यांसमोर मांडता येतील.

-गणेश वराडे - भांडुप

## पर्यटकांची पसंती आता मालदीव ऐवजी लक्षद्वीपला .........

काही दिवसापूर्वी पंप्रधान मोदीनी लक्षद्वीप बेटाला भेट दिली होती. या भेटीत त्यांनी समुद किनाऱ्यावरील नयनमनोहर फोटो काढले होते . त्याचा मोठा परिणाम जनमानसावर झाला . लोकांनी मालदेवाला पर्यटनाला जाणे बंद करून त्या ऐवजी लक्षद्विपला जाणे पसंत केले . त्यातच मालद्वीप च्या एका मंत्र्याने भारतीयांच्या बाबत वादग्रस्त वक्तव्य केल्याने लोकांनी मालदिव ऐवजी लक्षद्वीप ला पसंती दिली . ही बेटे भारतापासून खूपच लांब आहेत तथापि तेथील निसर्ग सौंदर्य अतिशय सुंदर आहे . यंदा एप्रिल ते जून कालावधीत या बेटाला जवळपास २२९९० पर्यटकांनी भेट दिली . गेल्या वर्षी ही संख्या ११०७४ एवढी होती . केवळ पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली नसून विमानाच्या संख्येत सुद्धा ही वाढ दिसून येते . ४१८ वरून ही वाढ तब्बल ७८६ वर गेली आहे . लक्षद्वीप च्या सध्याच्या विमानतळाचे विस्ताराचे काम पूर्ण होताच आणखी पर्यटक येतील असा अंदाज आहे . एकूणच भारतात पर्यटनाला मोठा वाव आहे . देशात अनेक पर्यटन स्थळे जागतिक वारसा स्थळात सामील आहेत . त्याचा फायदा सरकारने उठविला पाहिजे . परदेशी पर्यटकांना आकृष्ट केले पाहिजे . त्यातून आपणास परदेशी चलन मिळेल तसेच भारतीय उधोगाला सुद्धा चालना मिळेल . पर्यटन स्थळा भोवती छोटे उद्योग वाढीस लागतील . मालद्वीप चा एका मंत्र्याच्या विधानामुळे अनेक भारतीय पर्यटक दुरावले त्यामुळे कोणीही बोलताना अतिशय सावधानतेने बोलावयास पाहजे हा धडा मालद्वीपाला या निमित्ताने मिळाला आहे . आता लक्षद्विपला चांगले दिवस येतील व तेथे उधोग व पर्यटन वाढीस लागेल . आजकल अनेक भारतीय पर्यटनाचा आनंद लुटत आहेत . ही एक आशादायक घटना आहे.

**शांताराम वाघ पुणे**

५ वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४

## मालवण राजकोट येथील घटनेचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे निषेध

**उरण :** श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा राजकोट किल्ल्यावरील पुतळा कोसळण्याचा दुर्घटनेचे प्रतिसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटले आहेत. विविध राजकीय पक्ष, विविध सामाजिक संस्था संघटनांनी या घटनेचा जाहीर निषेध केला आहे. विविध राजकीय पक्षानेही निषेध केला त्यापैकी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित दादा पवार गट)तर्फे राज्यात अनेक ठिकाणी निषेध करण्यात आला.सदर घटनेचा उरण तालुक्यातही निषेध करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट)चे उरण तालुकाध्यक्ष कुंदा वैजनाथ ठाकूर व माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर यांनी उरण तहसीलदार कार्यालयातील नायब तहसीलदार रवींद्र सानप यांना निवेदन देऊन मालवणीतील राजकोट किल्ल्यावरचे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याचा घटनेचा निषेध केला.



### महत्त्वाचे

#### अ‍ॅल्युमिनियमच्या पाईपची चोरी

**पनवेल : :** कंपनीच्या आत प्रवेश करून चोरट्याने 70 हजार रुपये किमतीच्या पाईपची चोरी केल्याप्रकरणी आरोपी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. परशुराम घाणेकर हे स्वस्तिक स्टेशन वर्ल्ड, तळोजा एमआयडीसी येथे फॅक्टरी मॅनेजर म्हणून काम करतात. 22 ऑगस्ट रोजी कंपनीत असणाऱ्या मालाचे मोबाईल मध्ये फोटो काढून कंपनी बंद करून ते गेले. 24 ऑगस्ट रोजी कंपनीतील मालाची आणि मोबाईल मध्ये काढलेल्या फोटोची पाहणी केली असता कंपनीत असणारा माल कमी दिसून आला. चोरट्याने लोखंडी पत्रा उचकटून त्यावाटे कंपनीत प्रवेश केला व अ‍ॅल्युमिनियमच्या पाईपची चोरी केली.

#### जनावरांची कत्तल केल्याप्रकरणी गुन्हा

**पनवेल :** तळोजा गाव मच्छी मार्केटच्या बाजूला झाडी झुडपामध्ये निर्जन स्थळी अज्ञात इसमाने जनावरांची कत्तल केल्याप्रकरणी आरोपी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तळोजा गावच्या हद्दीमध्ये मुंब्रा पनवेल हायवे रोड मच्छी मार्केटच्या बाजूला अवैध बांधलेल्या शेडमध्ये व झाडी झुडपामध्ये निर्जन स्थळी जनावराचे कत्तल करून मटन विक्री करणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्त्यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी तळोजा पोलिसांना फोन केला. पोलिसांसोबत ते त्या ठिकाणी पोहोचले असता तीन जिवंत बैल मिळून आले. तसेच या ठिकाणी झाडीमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल केली असल्याचे दिसून आले. तीन जिवंत बैलांना चारा पाण्याची व्यवस्था न करता कृतापूर्वक पिवळ्या रंगाच्या रस्सीने चिखलात जखमा झालेल्या अवस्थेत बांधून ठेवलेले दिसून येत होते.

#### सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी

नवीन पनवेल :घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडून चोरट्याने एक लाख 31 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.उत्तम कुरकुटे हे एन के गार्डन वावंजेगाव येथे राहत असून ते घराला कुलूप लावून घर बंद करून कामावर निघून गेले. त्यांचा मुलगा दुपारी घरी आला असता घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेल्या अवस्थेत दिसला. यावेळी त्यांनी पाहणी केली असता सोन्याचे

# मित्राची सुपारी देणाऱ्याचीही झाली हत्या



**प्रतिनिधी**
■ **अलिबाग**

खोपोलीत गेल्या आठवड्यात (22 ऑगस्ट) एक कार सापडली होती. त्यात गोळीबाराच्या खुणा होत्या, रक्ताचे डाग होते आणि गाड़ीतील दोन मित्र इस्टेट एजंट गायब होते. त्यानंतर दोन दिवसांनी (23 ऑगस्ट) एका एजंटचा पेण-खोपोली रोडवरील गागोदी खिंडीच्या झाडीत मृतदेह सापडली होता. त्यानंतर मंगळवारी (27 ऑगस्ट) गायब असलेल्या दुसऱ्या मित्राचा मृतदेह कर्नाळा अभयारण्य परिसरात सापडला होता. या आठवडाभरात नवी मुंबई पोलिसांनी या हत्येची गूढ उकलले. आर्थिक व्यवहारातून मित्राच्या हत्येची सुपारी देणाऱ्यांने नंतर सुपारी घेणाऱ्यांसोबत आर्थिक व्यवहारावरून बिनसले आणि त्यांनी त्याचाच गेम केला. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे.

सुमित जैन (39) आणि अमिर खानजादा (42) हे दोघे नवी मुंबईतील नेरूळमध्ये इस्टेट एजंट होते. सुमित जैनने रायगडमधील पालीमध्ये साडेतीन एकर जमिनाचा व्यवहार केला होता. त्यात मृताच्या नावाने बोगस व्यवहार केला होता. ही बाब अमिर खानजादाला समजल्यावर त्यानेही त्यात वाटा मागितला. त्यानंतर वाटा देतानाच अमिरचा गेम करण्याचा प्लान सुमित जैनने रचला. त्यासाठी त्याने विठ्ठल नाकाडे याला 50 लाखांची सुपारी दिली. ठरल्यामुळे सुमित जैनने महत्त्वाच्या कामासाठी खोपोलीला जायचे असल्याचे अमिरला सांगितले. त्याप्रमाणे अमिर 21 ऑगस्टला गाडी घेऊन सुमितकडे आला. दोघेही रात्री खोपोलीच्या दिशेने निघाले. खोपोलीजवळ विठ्ठन नाकाडेने गोळी घालून अमिर खानजादाची हत्या केली. एवढेच नाही तर हा जीवघेणा हल्ला होता हे दाखवण्यासाठी सुमित जैनने स्वत:लाही जखमी करून घेतले होते. त्यानंतर नाकाडेला 50 लाख रुपये देण्यावरून सुमित जैन आणि नाकाडे यांच्यात वाद झाला. सुमित जैनने 25 लाख रुपये देणार असल्याचे सांगितले. यातून सुमित जैनची हत्या करण्यात आली. सुमित जैनचा मृतदेह पेण-खोपोली मार्गावरील गागोदे खिंडीत टाकण्यात आला तर खानजादाचा मृतदेह कर्नाळा अभयारण्यात परिसरात टाकण्यात आला.

**जीपीएसमुळे गाडीचा शोध**

सुमित जैन आणि अमिर खानजादा परत न आल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी नेरुळ पोलिसांकडे ते हरवल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर खानजादाच्या गाडीला जीपीएस असल्यामुळे पोलिसांनी शोध घेतला तेव्हा गाडी खोपोलीजवळ आढळून आली. त्यानंतर गाडीत गोळीबार झाल्याच्या खुणा, रक्ताचे डाग आणि दोन रिकामे काडतुसे आढळले होते.

## नवी मुंबईकरांना बाप्पा पावला
# मोरबे धरण भरले, पालिकेकडून जलपूजन



**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

खारघर, कामोठेसह नवी मुंबईकरांची तहान भागविणाऱ्या मोरबे धरण क्षेत्रात मागील दोन महिन्यात पावसाने जोरदार हजेरी लावल्याने धरणाने काठ गाठला आहे. १९०.८९० द.ल.घ.मी. इतकी साठवण क्षमता असलेल्या धरणाची पाणी पातळी ८८ मीटर आहे. बुधवारी मोरबे धरण पुर्ण क्षमतेने भरल्याने नागरिकांची वर्षभराची पाण्याची चिंता मिटली आहे. धरणाने काठ गाठल्याने पालिकेने गुरुवारी (ता.२९) विधीवत जलपूजन करुन पाण्याचा विसर्ग सुरु केला.

माजी मंत्री व ऐरोलीचे विद्यमान आमदार गणेश नाईक, पालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते आणि माजी महापौर सुधाकर सोनावणे व जयवंत सुतार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आणि माजी लोकप्रतिनिधी, पालिकेचे वरिष्ठ अधिकारी यांच्या समवेत जलपूजन करण्यात आले. त्यानंतर आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते रिमोट कंट्रोलची कळ दाबून धरणाचे दरवाजे १० से.मी.ने उघडण्यात आले. त्यानंतर पाण्याचा विसर्ग करण्यात आला.

आमदार गणेश नाईक मार्गदर्शन करताना म्हणाले की, मुंबई लगत नव्याने निर्माण झालेल्या नवी मुंबई शहरासाठी दूरदृष्टी समोर ठेऊन पालिकेच्या मालकीचे धरण घेण्याचा निर्णय संजीव नाईक महापौर असताना घेण्यात आला. ५० कोटींचे बजेट असताना ५०० कोटींचे धरण पालिका कसे घेईल?, यावरुन विरोधकांनी टिका देखील केली होती. परंतु राजकारण न करता मनापासून हाती घेतलेले व्हिजन पुर्ण करुन दाखविले आहे. आगामी १० ते १५ वर्षात नवी मुंबईची लोकसंख्या ३५ ते ४० लाखांपर्यंत जाणार आहे. या करीता पर्यायी धरण घेण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आमदार नाईक यांनी स्पष्ट केले. मोरबे धरण परिसरात अतिक्रमण करुन मोठया प्रमाणावर बंगले, गावे वसली आहेत. यामुळे धरण क्षेत्राला भविष्यात धोका निर्माण होऊ नये यासाठी बंगले आणि घरे, गावांचे ड्रोनच्या माध्यमातून सर्वेक्षण करुन महापालिकेच्या माध्यमातून परिपुर्ण सुविधा देऊन त्यांचे इतरत्र पुनर्वसन करण्यासाठी नियोजन करा, असे आमदार नाईक यांनी पालिका आयुक्त डॉ.शिंदे यांना सूचित केले.

## प्रमाणापेक्षा हवा भरल्याने टायर फुटला, एकजण जखमी

**प्रतिनिधी**
■ **भिवंडी**

भिवंडी तालुक्यातील मानकोली परीसरात इंडियन ऑईल पेट्रोल पंप च्या बाजूला असलेल्या टायरच्या दुकानांमध्ये हवा भरत असताना टायर मध्ये अति जास्त प्रमाणात हवा भरल्याने टायर अचानक फुटून हवेत उडाल्याने सुरेंद्र कुमार यादव वय 45 वर्ष याच्या तोंडाला जबर मार लागल्याने गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी जवळच्या खाजगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आला आहे.

जखमी सुरेंद्र यादव हा पंचर बनवण्यासाठी मानकोली येथील समीम पंचरवाला याच्याकडे गेला व समीम अली याने पंचर बनवून टायरमध्ये हवा भरली परंतु जखमी सुरेंद्र यादव यांनी या टायरमध्ये अजून हवा भरण्यास सांगितले परंतु समीम अलीने सांगितले की या टायरमध्ये हवा पुरेशी आहे तेव्हा पंचर बनवण्यासाठी आलेले सुरेंद्र यादव यांनी स्वतः टायरमध्ये हवा भरण्यास सुरुवात केली आणि त्यामुळे टायर मध्ये अति जास्त हवा भरली गेल्याने टायर अचानक फुटून उडाल्याने पंचर बनवण्यासाठी आलेले सुरेंद्र यादव यांच्या तोंडाला गंभीर जखमा झाले आहेत तात्काळ त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात नेण्यात आलं आणि तेथून त्यांना पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आला आहे. ही संपूर्ण घटना तेथे बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे. या संदर्भात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे .

## अलिबागमध्ये शालेय विद्यार्थिनींचा विनयभंग

### पालकांचा संताप, पोलिसात गुन्हे दाखल

**प्रतिनिधी**
■ **अलिबाग**

अलिबागमधील नामांकीत शाळेत दहावी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थिनीच्या दप्तरात कोणीतरी अश्लिल भाषेत चिठ्ठी लिहून ठेवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तर दुसरीकडे चोंढी येथील शाळेत शिकणाऱ्या मुलीला रस्त्यात अडवून तिचा विनयभंग केल्याचा प्रकार घडला. या घटनेनंतर पालकांमधून संताप व्यक्त होत आहे.

अलिबाग येथील एका इंग्रजी माध्यमात शिकणारी विद्यार्थिनी वर्गाबाहेर गेली होती. यावेळी तिच्या दप्तरामध्ये कोणीतरी अश्लिल भाषेत चिठ्ठी लिहून ठेवली. चिठ्ठीवर मुलाचे नावही लिहिण्यात आले होते. याबाबत सदर विद्यार्थिनीने तक्रार दिल्यानंतर अलिबाग पोलीस ठाण्यात वियनभंगासह पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरीकडे चोंढी येथील शाळेतील अल्पवयीन मुलीसोबत वियनभंगाचा प्रसंग घडला. सदर मुलगी घरी जात असताना, एका मुलाने तिचा पाठलाग करत, तिच्याशी बोलण्याचा, जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. तसेच त्या मुलीला आणि तिच्या मैत्रिणीला अश्लिल शिवीगाळ करत, हात लावत तिचा विनयभंगही केला.

या दोन्ही घटना 26 आणि 28 ऑगस्ट रोजी घडल्या आहेत. याबाबत दोन्ही मुलींनी अलिबाग व मांडवा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतर पोलिसांनी सदर मुलांविरोधात वियनभंगासह पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात केला आहे. या घटनांचा अधिक तपास मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक भोई व अलिबाग पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शरद शिंपने करत आहेत.

दरम्यान, बदलापूरच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरुन गेला. त्यानंतरही अल्पवयीन मुली, महिला अत्याचाराची अनेक प्रकरणे समोर येत आहेत. आता अलिबाग तालुक्यातील दोन नामांकित शाळांमधील विद्यार्थिनींच्या तक्रारीनंतर खळबळ उडाली आहे.

## जलजन्य, किटकजन्य व साथरोग आजार नियंत्रक जनजागृती शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप /डेंग्यू तसेच जलजन्य व साथरोग आजाराचा प्रसार रोखण्यासाठी नमुंमपा आरोग्य विभागामार्फत विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून याव्दारे नागरिकांमध्ये हिवताप /डेंग्यू, जलजन्य व साथरोग आजार तसेच आरोग्याविषयी प्रभावी जनजागृती केली जात आहे.

या माध्यमातून 24 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचून त्यांच्यामध्ये हे आजार रोखण्यासाठी घ्यावयाची खबरदारी तसेच आजारी पडल्यास करावयाच्या उपाययोजना याबाबत जागरूकता निर्माण करण्यात येत आहे.



अशाच प्रकारची विशेष शिबिरे 28 ऑगस्ट रोजी 24 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत विविध ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. या शिबिरांच्या ठिकाणी भेट दिलेल्या 13,256 नागरिकांमध्ये जाणीव जागृती करण्यात आली. तसेच यावेळी 1216 रक्त नमुने घेण्यात आले. आत्तापर्यंत 5 वेळा अशा प्रकारच्या विशेष शिबिरांचे आयोजन 24 प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांमार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी करण्यात आले असून या शिबीरांचा लाभ 40,825 नागरिकांनी घेतला आहे.

या शिबिरांचे वैशिष्टय म्हणजे याठिकाणी ॲनॉफिलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून तसेच नागरिकांना डासांच्या आळया प्रत्यक्ष दाखवून त्याचप्रमाणे घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती स्थाने उदा. पाणी साठवून ठेवलेले ड्रम हे ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे व आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करुन कोरडे ठेवणे, भंगार साहित्य, टायर्स इत्यादी नष्ट करणे, छतावरील प्लास्टिक शीट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे याबाबत नागरिकांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवित प्रोत्साहित करण्यात आले तसेच ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणेविषयी आवाहन करण्यात आले.

## खाडीत जोडप्याने मारली उडी, नवरा वाचला

### बायको बेपत्ता

**प्रतिनिधी**
■ **भाईंदर**

मीरा भाईंदरमधील वरसावे खाडीत एका महिलेनी उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. या महिलेला वाचवण्यासाठी तिच्या पतीने देखील खाडीमध्ये उडी मारली. पत्नी बुडाली असून तिच्या पतीला वाचवण्यात यश आले असून त्याला बाहेर काढण्यात आले आहे. सकाळी १० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. घरगुती वादातून या महिलेने खाडीमध्ये उडी घेतल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास अहमदाबादवरून मुंबईच्या दिशेने येणाऱ्या ब्रिजवरून वरसावे खाडीत एका जोडप्याने उडी मारली. शशिकला यादव (२८ वर्षे) आणि दिनेश यादव (३२ वर्षे) असं या पती-पत्नींची नावं आहे. शशिकला यादव आणि दिनेश यादव हे दोघे नायगाववरून या ब्रिजवर पोहोचले. अचानक या महिलेने वरसावे खाडीमध्ये उडी मारली. तिला वाचवण्यासाठी तिचा पती दिनेश यादव यांनी देखील उडी मारली.

**REMSONS INDUSTRIES LIMITED**

**सीआयएन:** एल५११९००एमएच१९७१पीएलसी०१५१४१
नोंदणी कार्यालय: ४०१, ४ था मजला, गॅलेडीओला, हनुमान रोड विले पार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७. दूरक्र: ०२२-२६२६२१००., २६११२२३६८
ई - मेल आयडी: corporate@remsons.com, संकेतस्थळ: www.remsons.com

**५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सचना आणि ई-व्होटिंग आणि बक क्लोजर**

कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') च्या कलम १०८ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ ('नियम') च्या नियम २० च्या तरतुदींनुसार, याद्वारे सूचना देण्यात आली आहे की:

१. कंपनीची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) शुक्रवार २० सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११:३० वा. (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हिसी') / इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यम ('ओएव्हीएम) सामान्य ठिकाणी सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवसायावर विचार करण्यासाठी ५२ व्या एजीएमची सूचना दिनांकित ८ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या कायद्याच्या लागू तरतुदींनुसार आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ("एमसीए") आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') यांनी जारी केलेल्या सर्व लागू परिपत्रकांसह वाचलेले नियम ) या संदर्भात.
२. एमसीए आणि सेबीने जारी केलेल्या कायद्याचे, नियमांचे आणि लागू परिपत्रकांचे पालन करून, ५२ व्या एजीएमची सूचना २०२३-२४ आर्थिक वर्षाच्या वार्षिक अहवालाच्या प्रतसह, केवळ इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे पाठविली गेली आहे ते सर्व सदस्य ज्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता संबंधित डिपॉझिटरी सहभागी किंवा कंपनी किंवा त्याचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट ('आरटीए') उदा. लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड. ५२ व्या एजीएम आयोजित करण्याच्या सूचनेसह तो वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे. www.remsons.com, स्टॉक एक्सचेंजची वेबसाइट म्हणजे बीएसई लि. उदा. www.bselndla.com, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड उदा. www.nselndla.com आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ('सीडीएसएल') च्या वेबसाइटवर म्हणजेच www.evotingindia.com वर उपलब्ध आहे.
३. कट-ऑफ दिनांक म्हणजे शुक्रवार, १३ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रत्याक्ष स्वरूपात किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात भाग धारण केलेले सदस्य इलेक्ट्रॉनिक मतदानाद्वारे ५२ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सामान्य आणि विशेष व्यवसायावर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतात. एजीएम ("रिमोट ई-व्होटिंग") च्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून सीडीएसएलची प्रणाली चा वापर करू हाकतात.
४. सेबीच्या अधिनियमाच्या कलम ९१ आणि नियमन ४२ च्या तरतुदींनुसार (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५, सदस्यांची नोंदणी आणि कंपनीची शेअर हस्तांतरण पुस्तके शनिवार, १४ सप्टेंबर, २०२४ ते शुक्रवार, २० सप्टेंबर, २०२४ (दोन्ही दिवसांसह) ५२ व्या एजीएमसाठी उद्देशाने बंद राहतील.
५. सर्व सदस्यांना कळविण्यात येते की:
i. ५२ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सामान्य आणि विशेष व्यवसाय असू शकतो इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाद्वारे व्यवहार;
ii दूरस्थ ई-मतदान मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ९:०० वाजता सुरू होईल;
iii रिमोट ई-व्होटिंग गुरुवार, १९ सप्टेंबर २०२४ रोजी सायं ५:०० वाजता संपेल.;
iv उपस्थित राहण्यासाठी आणि मतदान करण्यासाठी सदस्यांची पात्रता निश्चित करण्यासाठी कट-ऑफ तारीख ५२ व्या एजीएम शुक्रवार, १३ सप्टेंबर, २०२४ रोजी आहे;
v. कोणतीही व्यक्ती, जी कंपनीचे शेअर्स घेते आणि ५२ एजीएमची नोटीस पाठवल्यानंतर सदस्य बनते आणि कट-ऑफ तारखेला म्हणजेच शुक्रवार, १३ सप्टेंबर, २०२४ रोजी शेअर्स धारण करते, ती एक पाठवून वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. helpdesk.evoting@cdslindia.com किंवा rnt.hrlpdesk@linkintime.co.in वर विनंती करा;
vi सदस्यांनी लक्षात ठेवा की: ए) रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल सीडीएसएल द्वारे त्यानंतर मतदानासाठी अक्षम केले जाईल आणि सदस्यांना उपरोक्त तारीख आणि वेळेच्या पलीकडे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि एकदा एखाद्या सदस्याने ठरावावर मत दिले की, सदस्याला नंतर ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही; बी) ई-मतदानाची सुविधा ५२ वी एजीएम दरम्यान देखील उपलब्ध असेल; सी) ज्या सदस्यांनी ५२ व्या एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंग सुविधेद्वारे त्यांचे मत दिले आहे ते ५२ वी एजीएममध्ये व्हिसी/ओएव्हीएम द्वारे देखील भाग घेऊ शकतात परंतु ५२ व्या एजीएम दरम्यान त्यांना पुन्हा मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही; आणि डी) ज्या व्यक्तीचे नाव केवळ कट-ऑफ दिनांकाला डिपॉझिटरीजद्वारे ठेवलेल्या सदस्यांच्या नोंदणीमध्ये / लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये नोंदवले गेले आहे ती ५२ व्या एजीएममध्ये उपस्थित राहण्याचा आणि रिमोट ई-व्होटिंगची सुविधा घेण्यास पात्र असेल. तसेच ५२ व्या एजीएम दरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे ई-व्होटिंग.
६. डीमटेरिअलाइज्ड मोडमध्ये आणि फिजिकल मोडमध्ये शेअर्स धारण केलेल्या सदस्यांद्वारे रिमोट ई-व्होटिंग आणि ई-व्होटिंगची तपशीलवार पद्धत आणि ज्या सदस्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता नोंदविला नाही त्यांच्यासाठी ५२ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान केले आहे.

५२ व्या एजीएम दरम्यान रिमोट ई-व्होटिंग आणि व्हीसी/ओएव्हीएम किंवा ई-व्होटिंगद्वारे एजीएममध्ये सामील होण्यासंबंधीच्या शंका/तक्रारींसाठी, कृपया श्री. राकेश दळवी, सीनियर मॅनेजर, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग यांच्याशी संपर्क साधा. 25 वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाउंड्स, एन एम जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई - ४०००१३ किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल पाठवा किंवा ०२२-२३०५ ८५४२/४३ वर कॉल करा. सदस्य कंपनी सचिव आणि कंपनीचे अनुपालन अधिकारी यांना cs@remsons.com वर देखील लिहू शकतात.

रेमसन्स इंडस्ट्रीज लि. करीता
सही/-
रोहित दोरजी
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सभासद क्र. ए ३७०७७

ठिकाण: मुंबई
दिनांक: २९ ऑगस्ट २०२४

## जासई शंकर मंदिर उभारणीसाठी ठोस निर्णय हवा

### जेएनपीए प्रशासनाकडे जासई ग्रामस्थांची मागणी

**प्रतिनिधी**
■ **उरण**

जासई उड्डाणपुलावरील शंकर मंदिरामुळे उरणकडून पनवेलकडे जाणाऱ्या मार्गावरील एका मार्गिकचे काम रखडले आहे. यातील अर्ध्या मार्गिकेचे काम पूर्ण करून पुलाची दुसरी मार्गिकाही सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे उरण-पनवेल मार्गावरील जासई उड्डाणपुलाच्या दोन्ही मार्गिका सुरू झाल्या आहेत. मात्र उरणकडून पनवेलच्या दिशेला जाणाऱ्या मार्गावरील जासईतील शंकर मंदिराला पर्यायी जागा न मिळाल्याने उड्डाणपुलावरून उतरणारी एक मार्गिका रखडली आहे.

जेएनपीए प्रशासन शंकर मंदिराला मंजूर करण्यात आलेली २५ गुंठे जमीन जागेचा अधिकृत ताबा देऊन मंदिरातील शंकराची पिंडी स्थापित करणार नाही, तोपर्यंत मंदिराला हात लावू देणार नाही. तसेच प्रत्यक्ष काम सुरू करा, केवळ तोंडी आश्वासन नको अशी स्पष्ट भूमिका जासई ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत यांनी घेतली आहे.

या पुलावरील एकच मार्गिका सुरू असल्याने नवी मुंबई आणि पनवेलकडून येणारी तसेच उरणकडून पुलाखालून येणारी प्रवासी वाहने ये-जा करीत असताना वाहनांना शंकर मंदिर येथे वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. या समस्येमुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. त्यात आता पुलाला खड्डे पडल्याने भर पडली आहे. तर नवी मुंबई आणि पनवेलकडून येणारी तसेच उरण कडून पुलाखालून येणारी प्रवासी वाहने ये-जा करीत असताना वाहनांना शंकर मंदिर येथे वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

## मृत कर्मचाऱ्यांच्या अविवाहीत मुला-मुलींना पेन्शन मंजुर

**प्रतिनिधी**
■ **उरण**

केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकारच्या सेवानिवृत्त मृत कर्मचाऱ्याच्या अविवाहीत मुला-मुलींना पेन्शन मंजुर करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याचा लाभ मृत कर्मचारी व त्याच्या जोडीदाराच्या मृत्यूनंतर अविवाहीत मुलगा किंवा अविवाहीत मुलगी किंवा घटस्फोटीत मुलगी किंवा विधवा मुलगी यांना आता पेन्शन मंजूर केली जाणार आहे.

महाराष्ट्र सरकारच्या वित्त विभागांनी दिनांक ८ फेब्रुवारी २०२४ रोजी शासन निर्णय पारीत केला आहे, अशी माहिती रायगड जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाचे ज्येष्ठ सल्लागार तथा शिक्षक नेते दा.चां.कडू यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात दिली आहे.

मृत निवृत्त कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या जोडीदाराला पेन्शन मिळत होती. परंतु दोघांच्या मृत्यूनंतर आता अविवाहीत मुलगा किंवा अविवाहीत मुलगी किंवा घटस्फोटीत मुलगी किंवा विधवा मुलगी यांना पेन्शन मिळणार आहे.

## शेकापतर्फे उरणमध्ये दहीहंडीचे आयोजन, "पोलिसांच्या कार्याला दिली गोविंदांनी सलामी"

**प्रतिनिधी**
■ **पनवेल**

महाराष्ट्रात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. उरण मध्ये पारंपारिक पद्धतीने दहीहंडी साजरा करण्याची गावोगावी पद्धत आहे. शेतकरी कामगार पक्षातर्फे आज उरण मध्ये शेकापचे रायगड जि. खजिनदार प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या संकल्पनेतून भव्य "दहीहंडी-2024" चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाच, सहा



आणि सात थर लावणाऱ्या गोविंदा पथकांना रोख पारितोषिक आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. पिरकोन येथील वाघेश्वर गोविंदा पथकाने गेला काही दिवसांमध्ये पोलिसांनी केलेल्या कामगिरीबद्दल उरण पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना चार थराची सलामी देऊन उपस्थित सर्व पोलीस अधिकारी वर्गाला सन्मान दिला.

यावेळी पनवेलचे आदर्श मा नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, शेकाप रायगड जि. खजिनदार प्रितम म्हात्रे, महादेवशेठ बंडा, नरेशशेठ घरत, एल बी पाटील सर, काका पाटील, रमाकांत पाटील, विकासशेठ नाईक, शेखर पाटील, सौ. सीमाताई घरत, रमाकांत म्हात्रे, रवी घरत आणि शेकाप महिला पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करून दहीहंडी उत्सवाचा आनंद लुटला.

वृत्तमानस महाराष्ट्र
मुंबई, शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४

# साई दरबारात गाजलं तामिळनाडूतील प्रसिद्ध कुम्मी नृत्य

**शिर्डी:** तामिळनाडू राज्यातील भाविकांनी आज शिर्डीत येवून आपलं पारंपरिक असलेलं 'कुम्मी' हे नृत्य साईबाबांच्या शिर्डीत सादर केलं. साईबाबांवर असलेली अपरंपार श्रद्धा या लोकनृत्याच्या माध्यमातून तामिळनाडूतील भाविकांनी व्यक्त केली आहे. तिरुपूर येथील पावलाकोडी कुम्मीयाट्टकुट्टू हा ग्रुप आज साईबाबांच्या शिर्डीत आला. या ग्रुपमध्ये तब्बल 120 महिला तर 30 पुरुष कलाकारांचा सहभाग आहे.तामिळनाडू राज्यातील तिरुपूर येथील पावलाकोडी कुम्मीयाट्टकुट्टू हा ग्रुप आज साईबाबांच्या शिर्डीत आला. या ग्रुपमधील तब्बल 120 महिला आणि 30 पुरुषांनी आपल्या राज्यातील लोकप्रिय असलेलं 'कुम्मी' हे पाच तासांचं लोकनृत्य साईबाबा मंदिराच्या 3 नंबर प्रवेशद्वारा जवळील श्री साईबाबा शताब्दी मंडपात सादर केलं. या 'कुम्मी' लोकनृत्यादरम्यान सर्व महिलांनी हिरव्या साड्या परिधान केलेल्या दिसल्या. त्यांनी त्यांच्या नृत्यादरम्यान विविध युक्त्या दाखवल्या.



## म ह त्त्वा चे

### नाशकात अल्पवयीन मुलीने आयुष्य संपवलं

**नाशिक:** कोलकाता येथील घटना ताजी असतानाच नाशिकरोड येथील छेडछाडीला कंटाळून एका अल्पवयीन मुलीने आत्महत्या केल्याची घटना घडली. शाळेत आणि नंतर कॉलेजला जाणाऱ्या पंधरा वर्षीय मुलीचा पाठलाग करून, तिच्याशी लग्न करण्यासाठी मानसिक त्रास दिल्याने, या त्रासाला कंटाळून पीडित अल्पवयीन मुलीने आत्महत्या केली. या प्रकरणी तिला त्रास देणाऱ्या दहा जणांवर पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मोफत धान्याच्या नावाखाली महिलेची फसवणूक

**पुणे :** गरिबांना मोफत धान्य आणि रोख रक्कम देण्यात येत असून गरीब दिसण्यासाठी सोन्याचे दागिने काढायला लावले अन् हातचालाखीने ते लांबवून ज्येष्ठ महिलेची २ लाख ३१ हजारांची फसवणूक करण्यात आली आहे.याप्रकरणी पर्वती पायथा येथे राहाणाऱ्या ६५ वर्षीय महिलेने पर्वती पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार ३ अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### 17 वर्षीय गोविंदांचा मृत्यू

**जळगाव :** दहिहंडी फोडताना जखमी झालेल्या आणखी एका गोविंदाचा मृत्यू झालाय. अहमदपूर येथे काल रात्री दहीहंडी फोडण्यासाठी रचलेल्या थर कोसळून जखमी झालेल्या गोविंदाचा आज उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर शहरात काल रात्री दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दरवर्षी योद्धा प्रतिष्ठान मार्फत दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यासाठी भव्य बक्षीसही देण्यात येते. जिल्हाभरातून अनेक संघ यात सहभाग घेत असतात. दरम्यान, 17 वर्षीय तरण्याबांड गोविंदाचा मृत्यू झाल्याने सर्व स्तरातून दु:ख व्यक्त करण्यात येत आहे.

# सिंधुदुर्गमधील तिन्ही कळसूत्री बाहुल्यांचे सूत्रधार गृहमंत्री, त्यांना जाणीवपूर्वक महाराष्ट्र अशांत करायचाय

## सुषमा अंधारेंची राणेंसह फडणवीसांवर टीका

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

राणे पिता-पुत्राविरोधात सुषमा अंधारे यांनी यांच्या नेतृत्वात पुण्यामध्ये आंदोलन झाले. त्यानंतर आंदोलनाचा व्हिडिओ शेअर करत सुषमा अंधारे यांनी देवेंद्र फडणवीस यांना सवाल केला आहे. पत्रकार, सामान्य नागरिक, पोलिस यांच्याशी सतत दमदाटीची भाषा, गुंडागर्दी, सामाजिक प्रदूषण पसरवणाऱ्या राणेंवर गुन्हे दाखल झाले नाही तर याचा अर्थ या तीनही कळसूत्री बाहुल्यांचे सूत्रधार देवेंद्र फडणवीस आहेत अन् त्यांना जाणीवपूर्वक महाराष्ट्र अशांत करायचा आहे, असा आरोप केला.



शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी बुधवारी सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्याला भेट दिली. आदित्य ठाकरे राजकोटवर आले असतानाच रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे खासदार नारायण राणेही त्यांच्या समर्थकांसह गडावर पोहोचले. यावेळी नारायण राणे यांचे ज्येष्ठ पुत्र आणि माजी खासदार नीलेश राणे हे ही त्यांच्यासोबत होते. आदित्य ठाकरे यांना प्रवेश देण्यावरून नारायण राणे आणि नीलेश राणे यांनी पोलिसांशी संवाद घातला.

नीलेश राणे पोलिसांना धमकी देत असल्याचे तसेच खासदार असूनही नारायण राणे एकेकाला मारून टाकेन अशी जाहीर धमकी देताना दिसून आले. या सर्व पार्श्वभूमीवर नारायण राणेंवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करत पुण्यात शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी आंदोलन केले. यावेळी चार आणे, बाराणे, अटक करा नारायण राणे अशा घोषणा सुद्धा सुषमा अंधारे यांनी दिल्या. दरम्यान, सुषमा अंधारे यांनी पुण्यातील आंदोलनाचा व्हिडिओ शेअर करत गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांवर गंभीर आरोप केला आहे.

पुण्यातील आंदोलनातून सुषमा अंधारे यांनी नारायण राणे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. तुमचा इतिहास पोल्ट्री फार्मपासूनचा आम्हाला माहीत आहे. 1990 मध्ये श्रीधर नाईकांची हत्या झाली त्या हत्येचे तुम्ही मुख्य आरोपी होता. तुमच्यावर खटला चालवला गेला. तुमचा इतिहास इतका मोठा आहे की, 2002 मध्ये सत्यजित भिसेची कणकवलीत हत्या झाली त्याचाही आरोप तुमच्यावर होता, असेही त्या म्हणाल्या.

### सासरच्या जाचाला कंटाळून डॉक्टर तरुणीची आत्महत्या

## रशियात पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या पतीला ठोकल्या बेड्या

**प्रतिनिधी**
■ **छत्रपती संभाजीनगर**

महिला डॉक्टर पत्नीला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या डॉक्टर पतीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पतीच्या छळाला कंटाळून लग्नानंतर अवघ्या 5 महिन्यात डॉ प्रतीक्षा गवारे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली होती. याप्रकरणी अखेर त्यांचा पती प्रीतम गवारेला सिडको पोलिसांनी आता ताब्यात घेतलय. तो रशियात एमबीबीएस शिकलेला असल्यानं त्याच्याकडं विजा होता. रशियाला पळून जाण्याच्या तयारीत असतानाच शहरालगत असलेल्या पडेगावमधून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलंय.



24 ऑगस्ट रोजी डॉक्टर प्रतीक्षा गवारे यांनी आठ पानांची सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली.

छत्रपती संभाजी नगर शहरातील बजरंग चौक परिसरात राहणाऱ्या एका 26 वर्षीय विवाहित डॉक्टर तरुणीनं गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली. लग्नानंतर अवघ्या चार महिन्यातच पतीच्या त्रासाला कंटाळून या पत्नीनं गळफास घेतला होता.

# जळगावात ट्रकच्या धडकेत दोन तरुणी ठार

**प्रतिनिधी**
■ **जळगाव**

### एक चिमुकला जखमी : घटना सीसीटीव्हीत कैद

जळगावमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील राष्ट्रीय महामार्गावर होणाऱ्या अपघाताच्या घटना काही कमी होताना दिसत नाहीत. शहरातील महामार्गावरील मानराज पार्क ते गुजराल पेट्रोल पंपादरम्यान भीषण अपघातात एका ट्रकच्या धडकेत दोन तरुणींचा मृत्यू झाला आहे. ही घटना काल दुपारी दीड वाजता घडली आहे. जखमी चिमुकला एक वर्षाचा असून त्याला उपचारार्थ रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे.

जळगाव शहरातून जाणारा महामार्ग खड्डेमय झाला आहे. तसंच ते खड्डे चुकवण्याच्या प्रयत्नात नेहमी लहान-मोठे अपघात होत आहेत. आज घडलेल्या घटनेबाबत माहिती अशी की, दोन तरुणींसह एक चिमुकला दुपारी १.५० वाजेच्या



सुमारास दुचाकी क्रमांक एमएच.१८. एएस.५३७९ ने खोटेनगर स्टॉपकडून उड्डाण पुलाने मानराज पार्ककडे जात होते. उड्डाणपूल उतरताच भरधाव ट्रकने त्यांना धडक दिली. अपघात इतका भयावह होता की दोन तरुणींचा जागीच मृत्यू झाला . तर चिमुकला जखमी झाला आहे. त्याला उपचारार्थ रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे.

यादरम्यान घटनास्थळी मोठा जमाव जमला असून पोलीस पोहचले आहेत. दरम्यान, घटनेनंतर ट्रक चालक पसार झाला आहे. सदरची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. दरम्यान, माजी महापौर जयश्री महाजन या एका कार्यक्रमानिमित्त द्वारकानगरकडे जात असताना त्यांना महामार्गावर गर्दी दिसली. त्यांनी आपलं वाहन थांबवलं आणि काय झालंय? अशी विचारपूस केली. अपघात झाल्याचं कळताच माजी महापौर या मयतांच्या नातेवाईकांना घेऊन बाळ उपचारार्थ दाखल असलेल्या रुग्णालयात रवाना झाल्या.

# महिला अत्याचार अक्षम्य गुन्हा, कितीही बड्या बापाचा असला तरी त्याला माफी नाही




**प्रतिनिधी**
■ **बीड/आष्टी**

राज्यात वाढलेल्या महिला अत्याचाराच्या घटनांना राज्य सरकार गांभीर्याने घेत आहे. महिलांची सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार आहे. आरोपी कोणीही असो, कोणत्याही राजकीय पक्षाचा असो, किंवा कितीही मोठ्या बापाचा बेटा असो, त्याला माफी नाही, असा शब्द अजित पवार यांनी लाडक्या बहिणींना बीडमध्ये दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसची जनसन्मान यात्रा आज बीड जिल्ह्यात आहे. पहिली सभा बीड शहरात तर दुसरी सभा आष्टीमध्ये झाली. यावेळी अजित पवार यांच्यासह पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे, राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे, महिला आघाडीच्या अध्यक्ष तथा महिला आयोगाच्या प्रमुख रुपाली चाकणकर उपस्थित होत्या.

**महिला सुरक्षेला प्रथम प्राधान्य**

बदलापूर येथे दोन चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर राज्यात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. राज्य सरकारने आणलेल्या लाडकी बहीण योजनेला बॅक फूटवर जावे लागते का, अशी स्थिती गेल्या काही दिवसांमध्ये निर्माण झाली. बदलापूरच्या घटनेनंतर राज्यात ठिकठिकाणी अशा घटनांची माहिती समोर येऊ लागली. यामुळे विरोधकांकडून लाडकी बहीण नको, सुरक्षित बहीण योजना पाहिजे अशी टीका महायुती सरकारवर होत आहे. त्यालाच आज बीड आणि आष्टी येथील सभेतून अजित पवारांनी उत्तर दिले.

महिलांची सुरक्षा याला सरकारचे प्रथम प्राधान्य आहे. महिला अत्याचार हा अक्षम्य गुन्हा आहे. कितीही मोठ्या बापाचा मुलगा असला तरी त्याला माफी नाही. राज्यातील महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य ही आमची अधिकृत भूमिका आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. ते पुढे म्हणाले की, "महिलांना आता घरबसल्या ई-तक्रार करता येणार आहे. महिलांवरील अत्याचार प्रकरणात आता फाशीची शिक्षा देण्याची तरतूद केली आहे. महिला अत्याचाराबाबत राज्य आणि केंद्र सरकार कडक भूमिका घेत आहे."

मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा 35 फुटांचा पुतळा उद्घाटनानंतर आठ महिन्यांतच कोसळला. याबद्दल उपमुख्यमंत्री म्हणाले, "शिवाजी महाराज हे आमचे युगपुरुष आहे. हिंदवी स्वराज्याची स्थापना त्यांनी केली. आठरापगड जातींना, बारा बलुतेदारांना सोबत घेऊ स्वराज्य स्थापन केले.

## संजय गायकवाड पुन्हा वादात

# पोलिस की आमदारांचे घरगडी? पोलिस धुतायेत आमदाराची गाडी

**प्रतिनिधी**
■ **बुलढाणा**

आमदार संजय गायकवाड मतदारसंघ बुलढाणा, पक्ष शिवसेना शिंदे गट... नको त्या कारनाम्यांमुळे नेहमी वादात राहणारे आमदार अशीच गायवडांची ओळख बनत चाललीय. बदलापूर शाळेच्या संवेदनशील प्रकरणात राज्यातून संताप व्यक्त होत असताना 'आता मुख्यमंत्री शाळेत पहारा देणार का?" असं वादग्रस्त वक्तव्य करणारे गायकवाड पुन्हा नव्या वादात सापडले आहेत.

त्याचं झालं असं की, या आमदार महोदयांची गाडी चक्क एका पोलिस कर्मचाऱ्यांला धुवायला लावली. याचा व्हिडिओही समोर आला आहे. पोलिस कर्मचारी गायकवाडांच्या संरक्षणासाठी आहे आणि तो त्यांची गाडी धुतोय.

माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांनी हा व्हिडीओ शेअर केलाय. त्यामुळे पोलिस हे सुरक्षेसाठी आहेत की, आमदारांचे घरगडी, असा संतप्त सवाल केला जातोय. मात्र यावर पोलिस कर्मचाऱ्याने गाडीत उलटी केल्यामुळे गाडी धुतल्याची थातूर मातूर सारवासारव करण्याचा प्रयत्न आमदार गायकवाडांनी केलाय. गायकवाडांना वाद तसा नवा नाही. कारण यापूर्वीही त्यांनी नको ते कारनामे केले आहेत. मुलाच्या वाढदिवसाला तलवारीनं केक कापून मुलाला आणि पत्नीला तलवारीनंच केक भरवल्यामुळे ते वादात सापडले होते. विशेष म्हणजे त्यांनी आपल्या या गुन्हेगारी कृत्याचं निर्लज्जपणे समर्थनही केलं होतं.

त्यासाठी त्यांनी ऑलिम्पिकचं उदाहरण देऊन अकलेचे तारेही तोडले होते. यांमुळे त्यांच्यावर गुन्हाही दाखल करण्यात आलाय. काही महिन्यांपूर्वीच आपल्या गळ्यातील चैनीत वाघाचा दात असल्याचा दावा करत वाघाची स्वतः शिकार केल्याचं वक्तव्य केलं होतं. वन विभागाने त्यांच्याविरोधात गुन्हाही दाखल केला होता. आता पोलिसांना गाडी धुवायला लावून घरगड्यासारखी वागणूक देणारे गायकवाड पुन्हा वादात सापडले आहेत. यातच नेत्यांच्या सरंजामी वृत्तीचा पुन्हा एकदा पर्दाफाश झालाय.

# पुण्यातील तब्बल 1 हजार सीसीटीव्ही बंद

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी शहराच्या विविध भागात बसवण्यात आलेले 1054 सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. विशेष म्हणजे केबल तुटल्यामुळे आणि वीज पुरवठा नसल्यामुळे हे कॅमेरे बंद आहेत. या कॅमेर्यांचं सर्व नियंत्रण पोलीस खात्याकडे आहे मात्र हे कॅमेरे दुरुस्त कोणी करायचे यावरून महापालिका आणि पोलीस खात्यात टोलवाटोलवी सुरू आहे.

शहरातील वाढती गुन्हेगारी, अपघातांवर लक्ष ठेवण्याबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी



महापालिकेने शहराच्या विविध भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नियंत्रण पोलीस नियंत्रण कक्षाकडे सोपविण्यात आलं आहे. महापालिकेच्या विद्युत विभागाकडून शहरात 2909 सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. यापैकी 1855 सीसीटीव्ही कॅमेरे सुरू असून तब्बल 1045 सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. तर मार्केटयार्ड पोलीस चौकी आणि अलंकार पोलीस चौकीच्या हद्दीतील एकही सीसीटीव्ही कॅमेरा सुरू नाही.

शहरातील वाढती गुन्हेगारी व अपघातांच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व सीसीटीव्ही कार्यान्वित असणे आवश्यक आहे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून अनेक गुन्हे समोर येण्यास मदत झाली आहे. पण शहरातील 1054 सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत त्यामुळे शहरातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### पुण्यात अनधिकृत टेलिफोन एक्सचेंजचा पर्दाफाश

## दहशतवाद विरोधी पथकाकडून 1 अटकेत

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

पुण्यातील कोंढवा येथे गेल्या काही दिवसांपासून अनधिकृत टेलिफोन एक्सचेंज चालवणाऱ्या एकाला दहशतवाद विरोधी पथकाकडून अटक करण्यात आली आहे. नौशाद अहमद सिद्दीकी, वय ३२ वर्षे असं अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचं नाव आहे. त्याच्याकडून विविध कंपन्यांचे ७ सिम बॉक्स, ३७८८ सीम कार्ड, ९ वायफाई राउटर, सिमबॉक्स चालवण्याकरता वापरण्यात येणारे अँटीना, सीमबॉक्स कायम कार्यान्वीत राहावा याकरीता वापरण्यात येणारे इनव्हर्टर, लॅपटॉप असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बेकायदेशीर सिमबॉक्सच्या सहाय्याने अनधिकृत टेलिफोन एक्सचेंज चालवत असल्याबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दहशतवाद विरोधी पथक पुणे युनिट यांनी अधिकारी तसंच शासकीय पंच यांच्या समवेत त्याच्या कार्यक्षेत्रातील कोंढवा परिसरातील एम ए कॉप्लेक्स, मीठा नगर, कोंढवा या ठिकाणी छापा टाकला. त्या ठिकाणी अनधिकृत टेलिफोन एक्सचेंजचा शोध घेतला. या कारवाई दरम्यान विविध कंपन्यांचे ७ सिम बॉक्स, ३७८८ सीम कार्ड, ९ वायफाई राउटर, सिमबॉक्स चालवण्याकरता वापरण्यात येणारे अँटीना, सीमबॉक्स कायम कार्यान्वीत राहावा यासाठी

# निराधार, विधवा, परीतक्ता, अपंगांचे मानधन 5 हजार रुपये करा

### देवठाण मेळाव्यामध्ये किसान सभेची मागणी

**प्रतिनिधी**
■ **अकोला**

मतांवर डोळा ठेवून एकीकडे सरकार लाडली बहीण योजना राबवण्याचा गवगवा करत असले, तरी दुसऱ्या बाजूला मात्र गेले अनेक महिने विधवा, परित्यक्ता, अपंग, निराधार, वृद्धांचे मानधन आलेले नाही. त्यामुळे या अत्यंत गरीब आणि निराधार जनसमुहाला अत्यंत वाईट अवस्थेला सामोरे जावे लागत आहे. अकोले तालुक्यामध्ये लालबावटा निराधार युनियनच्या नेतृत्वाखाली 9 हजारांपेक्षा जास्त निराधारांना संघटनेच्या माध्यमातून दिलासा देण्याचे काम सुरू आहे. संघटनेच्या वतीने थकीत मानधन



तातडीने द्या व मानधनात वाढ करून ते किमान 5 हजार रुपये करा या मागणीसाठी मेळाव्यांची मालिका सुरू करण्यात आली आहे.

देवठाण येथे या अंतर्गत नुकताच पहिला मेळावा घेण्यात आला. हिरडा हमी भाव व लागवड प्रोत्साहन मोहीम अंतर्गत यापूर्वी तालुक्यात कोतूळ, राजुर, शेंडी व समशेरपुर येथे विभागीय मिळावे संपन्न झाले आहेत.

कोतुळ येथे संपन्न झालेल्या 33 दिवसांच्या दूध आंदोलनामध्ये मान्य झालेल्या मागण्यांची माहितीही यावेळी उपस्थितांना देण्यात आली. दूध अनुदान अद्यापही सरकारने वर्ग केलेले नाही. याबाबत येत्या काळात आंदोलन उभारण्याबाबत यावेळी सूतोवाच करण्यात आले. सोयाबीनचे दर सातत्याने कोसळत असून हंगामाच्या सुरुवातीलाच दर 3500 पर्यंत खाली कोसळले आहेत. केंद्र सरकारने सोयाबीनला 4892 रुपये प्रति क्विंटल आधारभाव जाहीर केला असताना हंगामापूर्वीच 3500 पर्यंत भाव कोसळले असतील तर प्रत्यक्षात ज्यावेळी हंगामातील मुख्य पीक बाजारात येईल त्यावेळी हे भाव अधिक खाली जाण्याची भीती आहे.

# खासदार छत्रपती शाहू महाराज यांनी दिली राजकोट किल्ल्याला भेट

**प्रतिनिधी**
■ **सावंतवाडी**

किल्ले राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याची घटना घडल्यानंतर कोल्हापूर येथील खासदार छत्रपती शाहू महाराज यांनी बुधवारी रात्री राजकोटला भेट देत पाहणी केली. यावेळी बोलताना छत्रपती शाहू महाराज म्हणाले, राजकोट येथे घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आणि दुःख देणारी आहे.

आजपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची घटना कधीही घडली नाही ती येथे घडली आहे. ही घटना का घडली? कोणामुळे घडली. कशामुळे घडली. याचा विचार व्हावा. याला जे जबाबदार आहेत त्या सर्वांवर कारवाई व्हायलाच हवी. आज मी येथे येऊन पाहणी केल्यानंतर संपूर्ण बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे आहे हे दिसून आले. त्यामुळे याची सखोल चौकशी होऊन जे दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी काँग्रेसचे साईनाथ चव्हाण, अरविंद मोंडकर, देवानंद लुडबे,ठाकरे शिवसेनेचे बाबी जोगी व इतर उपस्थित होते.

# कोल्हापुरात शिक्षण उपसंचालक कार्यालयात शिक्षकांचं आमरण उपोषण

### शेवटी आमच्या तिरढ्या उचलाव्या लागतील, शिक्षकांचा इशारा

**प्रतिनिधी**
■ **कोल्हापूर**

वाढीव टप्पा अनुदानासाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने विविध माध्यमातून कोल्हापुरात आंदोलन सुरू आहे. कोल्हापुरात शिक्षण उपसंचालक कार्यालयामध्ये एक ऑगस्टपासून अशंत: विनाअनुदानित शिक्षकांनी आंदोलन पुकारलं आहे. मात्र, शासनाने याची दखल घेतली नसल्याने शेवटी शिक्षकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

गेल्या चार दिवसांपासून शिक्षतांनी बेमुदत आमरण उपोषण सुरू केलं आहे. आजचा आमरण उपोषणाचा चौथा दिवस आहे. शिक्षकांनी कार्यालयात भजन करत आपल्या मागण्यांकडे शासनाचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. दरम्यान जोपर्यंत शासन वाढीव टप्पा अनुदानाचा जीआर काढत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरू राहणार



असल्याचा इशारा शिक्षकांनी दिला आहे. शिक्षकांना वाढीव टप्प्यानुसार अनुदान देणार नसाल, तर शेवटी आमच्या येथून तिरढ्या उचलाव्या लागतील असा इशारा आंदोलक शिक्षकांनी दिला आहे.

राज्य सरकारने जून 2024 पासून वाढीव 20 टक्के टप्पा दिला जाईल, अशी घोषणा केली होती. परंतु, सदर घोषणेचा आदेश शासन निर्णय अद्याप करण्यात आलेला नाही.

# पंढरपूर एमआयडीसीचा प्रश्न मनसेच्या पाठपुराव्यामुळे मार्गी - दिलीप धोत्रे

### पंढरपूर एमआयडीसीला मंजुरी मिळाल्यानंतर शासन आणि प्रशासनाचे मानले आभार

**प्रतिनिधी**
■ **पंढरपूर**

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पंढरपूर एमआयडीसीचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून कासेगाव येथे एमआयडीसी उभारण्याला काही दिवसापूर्वी औद्योगिक विकास महामंडळाची मंजुरी मिळाली आहे. यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने शर्तीचे प्रयत्न केले होते. अखेर याला यश आले असल्याची माहिती मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांनी पंढरपूर येथे मनसे कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी त्यांनी शासन आणि प्रशासनाचे आभार



मानले. याप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी तसेच पंढरपूर येथील युवक, सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना दिलीपबापू धोत्रे म्हणाले की गेली अनेक वर्षांपासून पंढरपुर परिसरात एमआयडीसी उभारण्यात यावी अशी मागणी होती. यासाठी मनसे कडून पाठपुरावा सुरू होता. मात्र आपल्या संस्थेमध्ये कोण कामाला मिळणार नाहीत या भीतीमुळे पंढरपूर येथील नेतेमंडळींनी याला विरोध केला असल्याचा आरोप मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी केला. पंढरपूर परिसरात एमआयडीसी व्हावी यासाठी अनेक वर्षांपासून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या माध्यमातून पाठपुरावा करून प्रयत्न केल्याने एमआयडीसीचा प्रश्न मार्गी लागला आहे. मात्र एमआयडीसी मंजूर झाल्यावर लोकप्रतिनिधी श्रेय घेण्याचा प्रयत्न करत असल्याची खंत यावेळी त्यांनी व्यक्त केली.

# संत ज्ञानेश्वर चषक कॅरम स्पर्धेत सार्थक, निल, देविका, पुष्करची विजयी सलामी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

ज्ञानेश्वर विद्यालय-वडाळा, आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व सुमती सेवा मंडळतर्फे राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सुरु झालेल्या संत ज्ञानेश्वर चषक आंतर शालेय कॅरम स्पर्धेत सार्थक केरकर, निल म्हात्रे, देविका जोशी, पुष्कर गोळे, अमेय जंगम आदींनी सलामीचे सामने जिंकले. पार्ले टिळक विद्यालयाच्या सार्थक केरकरने तरुण यादवचे आव्हान २१-५ असे सहज संपुष्टात आणतांना उत्तम फटकेबाज खेळ केला. स्पर्धेचे उदघाटन ज्ञानेश्वर विद्यालयाचे अध्यक्ष धैर्यशील जाधव, खजिनदार भास्कर सावंत, मुख्याध्यापक महेंद्र पाटील, सुमती सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रमोद पार्टे,



शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

संत ज्ञानेश्वर चषक आंतर शालेय कॅरम स्पर्धेची दुसरी फेरी गाठताना डोंबिवलीच्या पाटकर विद्यालयाच्या निल म्हात्रेने मोहमद फारुकीला २५-० असा निल गेम दिला. देविका जोशीने सरळ जाणाऱ्या सोंगट्यांचे सातत्य राखत तन्वी कांबळेवर १६-० असा विजय मिळविला. अन्य सामन्यात पुष्कर गोळेने केतकी मुंडलेचा ११-५ असा, अमेय जंगमने आर्य बनसोडेचा २१-६ असा, सैफ शेखने गणेश उपाध्यायचा १५-६ असा, हर्ष मोहितेने साहिल वाघेलाचा ८-१ असा तर ओवाईस पठाणने आयुष कांदळगावकरचा १०-० असा पराभव करून पहिली फेरी जिंकली. स्पर्धेमध्ये मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रत्नागिरी आदी जिल्ह्यांतील ६५ शालेय खेळाडूंनी भाग घेतला असून वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालय सभागृहात रंगतदार खेळ करीत आहेत.

---

## पनवेल महानगरपालिका

### वैद्यकीय आरोग्य विभाग

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
वैद्यकीय आरोग्य विभाग : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल : mohpmc05@gmail.com

फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२ - २७४५२३३९
वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/४३४० / सन २०२४-२५

दिनांकः२८/०८/२०२४

### पदभरती जाहिरात

वाचा :-
१. मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२४-२५ नुसार मंजुर पदे
२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसो/मनुष्यबळ कक्ष/सुधारित पदभरती समिती / १०२६६-१०६००/२०२३ दि.२६.०४.२०२३ रोजीचे पत्र
३. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा.क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष / पदभरती / १०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्र.
४. सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. रानाआअ / शैक्षणिक पात्रता / एनयुएचएम/२४००४-२४१८७/२३ दिं २४.०५.२०२३ रोजीचे पत्र.
५. शासन निर्णय क्र. बीसीसी-२०२४/प्र. क्र.७५/१६- क दि. २७/०२/२०२४
६. मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र जा. क्र. राआसोमुं / मनुष्यबळ / कं. पदभरती/२७४१५-६६३/२०२४ दि.३.०७.२०२४
७. मा. आयुक्त महोदयांची मंजुर टिपणी दि. २६.०८.२०२४

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व १५ वा वित्त आयोग अंतर्गत, पनवेल महानगरपालिकेकरिता रिक्त असलेल्या पदांवर खालील दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी पदभरती प्रक्रियेद्वारे इच्छुक व पात्र उमेदवारांच्या नेमणुका पनवेल महानगरपालिका यांच्या स्तरावरून गठीत केलेल्या समितीमार्फत थेट मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहेत. यासाठी बुधवार दि.०४.०९.२०२४ रोजी दुपारी २.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेमध्ये थेट मुलाखती आयोजित करण्यात येत आहेत. सदर पदांसाठी अर्जाचा विहित नमुना पनवेल महानगरपालिकेच्या या www.panvelcorporation.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी वरील प्रमाणे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

| अ क्र | पदाचे नाव | कार्यक्रम | रिक्त पदे | आरक्षणा नुसार जात प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुर्णवेळ वैद्यकीय अधिकारी | राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान | ०५ | तात्पुरत्या स्वरूपात | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | रूपये ६०,०००/- प्रतिमहा |
| २ | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान | ११ | आरक्षण लागु नाही | MBBS with MMC Rcg Preference will be given to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | रूपये ३०,०००/- प्रतिमहा |
| ३ | वैदयकीय अधिकारी | १५ वा वित्त आयोग कार्यक्रम | ०३ | तात्पुरत्या स्वरूपात | MBBS with MMC Rcg Preference will be given to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | रूपये ६०,०००/- प्रतिमहा |
| ४ | मानसोपचार तज्ञ Psychiatrist | पॉलिक्लिनिक अंतर्गत | ०२ | आरक्षण लागु नाही | १) MBBS with MD Psychiatry / DPM/ DNB २) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | To visit once in every fortnight. Rs.२००० to be paid as fixed amount per visit + Rs.१०० per patient checked his/ her specialty, maximum to Rs.5000/ per visit(१ वर्षासाठी मानसोपचार तज्ञ - २६ भेटी व कान -नाक-घसा तज्ञ २५ भेटी ) |
| ५ | कान - नाक - घसा तज्ञ ENT Specialist | पॉलिक्लिनिक अंतर्गत | ०१ | आरक्षण लागु नाही | १) MS ENT / DORL / DNB २) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | |

अर्जदाराच्या वरील मुलाखती नंतर निवड सुचीमधील पात्र उमेदवारांना गुणवत्तेनुसार नियुक्त्या दिल्या जातील व उर्वरीत पात्र उमेदवारांची प्रतिक्षायादी ठेवण्यात यईल. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदावर या प्रतिक्षायादी मधील उमेदवारामधुन गुणवत्ता यादी प्रमाणे उमेदवारास नियुक्ती दिली जाईल.

**अर्जदाराची वयोमर्यादा-**
१. अर्ज भरण्याच्या दिनांकास उमेदवाराचे वय जाहिरातीमध्ये विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.
२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि. २५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार वैद्यकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष राहील. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्ट्या व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**अर्ज भरण्या बाबतच्या सुचना-**
१. उमेदवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.
२. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीख अर्जात नमूद करावी.
३. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष ) अचूक नमुद करावे.
४. अर्जात उमेदवाराचे लिंग व वैवाहिक दर्जा या बाबतची माहिती नमूद करावी.
५. महिला अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Certificate) तसेच नावात बदल असल्यास (Govt. Gazette) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
६. अर्जामध्ये उमेदवाराने स्वतःच्या वैध ई-मेल आयडी / पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे.
७. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
८. उमेदवाराने अर्जामध्ये आपला जात, धर्म हा तपशील अचूकपणे नमूद करावा.
९. इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्टया दुर्बल घटक प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
१०. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरूपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.
११. अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.
१२. अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**शैक्षणिक अर्हता/पात्रता-**
१. शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.
२. उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.
३. अर्ज भरत असताना पात्रता परिक्षेत अंतिम वर्षात मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी, अर्जातील नमुद टक्केवारीसह न जुळल्यास, असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.
४. उमेदवारांनी मुलाखतीवेळी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका व इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.
५. पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता / पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे..
६. उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

**अनुभव -**
१. शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा शासकीय व निम शासकीय अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करू नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.
२. अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना अर्जदाराने शासकीय व निम शासकीय संस्थेच्या अनुभव प्रमाणपत्रामधील दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.
३. ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**संगणक अर्हता-**
१. MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा...

**लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र-**
१. लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासुन लागू करण्यात आली असून दि. २३/०७/२०२०. पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियान व १५ वा वित्त आयोगाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.
२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे...

**अर्ज शुल्क - (विशेषतज्ञ वगळुन)**
१. उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्कासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू. १५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- असे अर्जाचे शुल्क असेल. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. "INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY PANVEL"
२. राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षा व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्षा शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. असे अर्ज अपात्र करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी-**
१. उमेदवाराने अर्जावरील फॉर्म वर फोटोकरीता राखीव ठेवलेल्या जागेवर त्यांचा अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.
२. अर्जदाराने स्वाक्षरी साठी राखीव ठेवलेल्या जागेत स्वाक्षरी करावी.

**निवड प्रक्रिया-**
या निवड प्रक्रियेसाठी मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा.क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्र/ पदभरती /१०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्राद्वारे प्राप्त

**सुचना पुढीलप्रमाणे:**
१. सदर पदभरती करीता पात्र होणाऱ्या उमेदवारांची थेट मुलाखत पनवेल महानगरपालिका स्तरावरील निवड समितीमार्फत घेण्यात येईल.
२. मुलाखतीद्वारे निवड करावयाची असल्यास मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १: ३ व १:५ उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

**गुणांकन पद्धती -**

| अ.क्र | विवरण | अधिकत्तम गुण |
|---|---|---|
| १ | Subject Knowledge | १० |
| २ | "Research & Academic Knowledge" | १० |
| ३ | Leadership Quality | १० |
| ४ | Administrative Abilities | १० |
| ५ | Experience | १० |
| | a) For Govt. Experience | 2 Marks for one year |
| | b) For Private Experience | 1 Marks for one year |
| | **एकुण गुण** | **५०** |

३. अर्जदाराच्या अर्जाची छाननी करून थेट मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांची यादी थेट मुलाखतीच्या वेळी सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.
४. समान गुण प्राप्त झाल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडित अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
५. थेट मुलाखतीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची यादी व प्रतिक्षा यादी पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
६. सदर ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहील व त्यासाठी ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.

**सर्वसाधारण सुचना-**
१. सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www. panvelcorporation.com या संकेस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करून घेणे त्यांची जबाबदारी राहिल. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.
२. जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णत: कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही, या पदाचा राज्य शासनाच्या पदाशी काहीही संबंध नसून उमेदवार भविष्यात राज्य शासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.
३. जाहीरातीत नमूद केलेल्या पदाचे मानधन हे एकत्रित ठोक मानधन आहे.
४. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. (उमेदवाराने निवडीसाठी कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरेल)
५. उमेदवाराने थेट मुलाखतीच्या वेळेस अर्जासोबत मुळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे.
६. थेट मुलाखतीकरिता येणाऱ्या अराखीव प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १४) कागदपत्रे जोडावीत व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १६) कागदपत्रे जोडावीत.

इच्छुक पात्र उमेदवाराने संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील भरलेला अर्ज व त्या संबंधातील आवश्यक त्या कागदपत्रासह थेट मुलाखतीच्या दिवशी पनवेल महानगरपालिका (मुख्यालय), वैद्यकीय आरोग्य विभाग, पहिला मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल - ४१०२०६, या पत्त्यावर पुढील वेळापत्रकानुसार थेट मुलाखतीकरिता उपस्थित राहावे.

**थेट मुलाखतीचे वेळापत्रक :-**

| अ. क्र. | पदाचे नाव | मुलाखतीचा वार | वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पुर्णवेळ / अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी / विशेषतज्ञ | बुधवार दिनांक ०४.०९.२०२४ रोजी | मुळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे तपासणी सकाळी ११.०० ते ०१.०० व थेट मुलाखत दुपारी ०२.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत | पनवेल महानगरपालिका वैदयकीय आरोग्य विभाग देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल - ४१०२०६, |

**मुलाखतीवेळी खालील कागदपत्रांसह उमेदवाराने हजर राहणे आवश्यक आहे.**
१) पुर्ण माहिती भरलेला अर्ज
२) वयाचा पुरावा
३) पदवी/पदविका प्रमाणपत्रे
४) गुणपत्रिका (सर्व वर्षाची गुणपत्रिका व प्रमाणपत्रे)
५) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (MBBS) / Any other Medical Graduate with respective council registration (As Applicable).
६) शासकीय / निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्रे
७) आधारकार्डची छायांकित प्रत
८) सध्याचा फोटो (२ प्रती)
९) महिला अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Certificate) तसेच नावात बदल असल्यास राजपत्रातील (Govt. Gazette) आपल्या नावाचा उल्लेख असलेल्या पानाची छायांकित प्रत.
१०) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
११) अर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र
१२) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
१३) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft)
१४) MS - CIT प्रमाणपत्र
१५) जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र सर्व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे.
१६) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (अजा, अज प्रवर्ग वगळुन इतर राखीव प्रवर्गातील) उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे.

आदिवासी बहुल जिल्हयांसाठी आरक्षणाची पदे भरणे बाबत कार्यवाहीकरिता सुधारित सुचना प्राप्त नसल्याने रिक्त पदांचे संवर्गनिहाय विगतवारी दर्शविण्यात आलेली नाही. बिंदुनामावली बाबत सुधारित सुचना प्राप्त झालेनंतर त्यांचे अधिन राहुनच पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी (राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व १५ वा वित्त आयोग अंतर्गत) या पदाकरीता नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकते नुसार बदल करण्याचे व सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती, पनवेल महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. कृपया याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ. आनंद गोसावी)**
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
पनवेल महानगरपालिका

### अर्जाचा नमुना

( ------------------------------------------------------------------------- या पदासाठी अर्ज )

प्रति,
मा. आयुक्त
पनवेल महानगरपालिका

उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५. से.मी) आकाराचा फोटो चिकटवून स्वतः साक्षांकीत करावा

१. संपूर्ण नाव : ------------------------------------------------
(प्रथम आडनाव)
२. वडिलाचे / पतीचे नाव : ------------------------------------------------
३. सद्या राहण्याचा पत्ता : ------------------------------------------------
------------------------------------------------
४. भ्रमणध्वनी क्रमांक : (१) ---------------------------- (२) ----------------------------
५. जन्मतारीख : ---------------------------- दिनांक: / /२०२४ रोजीचे वय -----------
राष्ट्रीयत्व ---------------------------------
६. उमेदवार विवाहीत / अविवाहित : ------------------------------------------------
७. (अ) जात : ------------------------------------------------(ब) जात वैधता प्रमाणपत्र : आहे / नाही.
८. धर्म : ------------------------------------------------
९. ई-मेल आयडी : ------------------------------------------------
१०. खाली नमुद केलेल्या प्रवर्गापैकी योग्य चौकोनात ( ) अशी खुण करावी.

| अ.जा. (SC) | अ.ज. (ST) | वि.जा (अ) (VJ-A ) | भ.ज. (ब) (NT-B) | भ.ज. (क) (NT-C) | भ.ज. (ड) (NT-D) | वि.मा.प्र (SBC) | इ.मा.व (OBC) | ई.डब्ल्यू.एस (EWS) | खुला (OPEN) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

११. शैक्षणिक अर्हता- जसे MBBS / MBBS Psychiatrist (MD Psychiatry / DPM/DNB) ENT Specialist (MS ENT/DORL/ DNB)

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्षे | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकूण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)
१२. अतिरिक्त अर्हता :- जसे पदवीत्तर

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्षे | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकूण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)
१३. अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकूण वर्ष | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |

(प्रमाणपत्राच्या प्रती)
१४. अवगत असणाऱ्या भाषा :

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

१५. आपणा विरुद्ध न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालु आहे काय ? ( असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)
१६. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैद्यता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र / नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकारक आहे.)

| | |
|---|---|
| १. | २ |
| ३. | ४. |

१७. वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असनु ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशिर कारवाई होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण: (अर्जदाराची स्वाक्षरी व नाव )
दिनांक :

**प्रतिज्ञापन**

**नमुना अ**

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------
श्री. ------------------------------------------------ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी
वय.................... वर्ष, राहणार ------------------------------------------------
याद्वारे असे जाहिर करतो / करते की,
(१) मी---------------------------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
(२) आज रोजी मला ----------------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या--------आहे. ( असल्यास जन्मदिनांक नमूद करावा )
(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:- सही/-
दिनांक:-

### फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे हमीपत्र

मी.श्री./श्रीमती/कुमारी------------------------------------------------
वय ---------------------- वर्ष --------------------- सध्या राहणार असे लिहुन देते/देतो की, या पत्यावर ------------------- वर्षापसून आजपर्यंत राहत आहे.
तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी रहात असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

सही/-

जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.३९३/३९४/२०२४
संदर्भ :- जा.क्र. पपा / वै. आ.वि / ४९४१ / सन २०२४-२५ दिनांक: २८/०८/२०२४ रोजीचे पत्रान्वये.

## अफगाणिस्तानमध्ये 5.7 रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप; दिल्लीपर्यंत जाणवले धक्के

**काबूल :** आज सकाळी अफगाणिस्तानमध्ये भूकंपाचा मोठा धक्का बसला आहे. या भूकंपाची तीव्रता ५.७ रिश्टर स्लेक इतकी नोंदवण्यात आली आहे. या भूकंपाचा प्रभाव राजधानी दिल्ली आणि आजुबाजुच्या परिसरातही जाणवला आहे. महत्त्वाचे म्हणजे या भूकंपात अद्यापपर्यंत कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे. आज सकाळी ११.२६ मिनिटांनी या भूकंपाची नोंद झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे दोन आठवड्यांपूर्वीसुद्धा अशाच प्रकारे भूकंपाची घटना घडली होती. त्या भूकंपाची तीव्रताही ४.८ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली होती. सुदैवाने त्या घटनेतही कोणतीही जीवितहानी झालेली नव्हती. अफगाणिस्तान हा भूकंपासाठी अतिशय संवेदनशील मानला मानला जातो. गेल्या काही वर्षात अफगाणिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात भूकंपाच्या घटना घडल्या आहेत. मीडिया रिपोर्टनुसार, या घटनांमध्ये चार हजार पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर नऊ हजार नागरिक जखमी झाले आहेत. या घटनांमध्ये १२ हजारांपेक्षा जास्त घरांचे नुकसान झालं आहे. या




# गुजरातमध्ये पुराचे थैमान, 26 जणांचा मृत्यू

## 18,000 जणांना सुरक्षित स्थळी हलविले; पंतप्रधानांकडून मदतीचे आश्वासन

वृत्तसंस्था
अहमदाबाद

गुजरातमध्ये काही दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत असून राज्याच्या अनेक भागात पूर आला आहे. बडौद्याला पूराचा सर्वाधिक फटका बसला असून शहरातील काही भागात 10 ते 12 फुटापर्यंत पाणी साचले आहे. मागच्या तीन दिवसांत पाऊस आणि पूरामुळे 26 जणांचे मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. तर पूरग्रस्त भागातून 18 हजार लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. यानंतर गुरूवारी हवामान विभागाने 10 जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट तर 22 जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे.



गुजरात सरकारने दिलेल्या माहितीनुसार, मोरबी, बडौदा, भरूच, जामनगर, अरवली, पंचमहल, द्वारका आणि दांग या जिल्ह्यात प्रत्येकी एका नागरिकाचा मृत्यू झाला. तर आनंद जिल्ह्यात सहा, अहमदाबादमध्ये चार आणि गांधीनगर, खेडा, महीसागर, दाहोड आणि सुरेंद्रनगरमध्ये प्रत्येकी दोन जणांचा मृत्यू झाला आहे.

पूरातून वाचण्यासाठी अनेक भागात लोकांनी घराच्या छतावर आसरा घेतला आहे. बडौदामधील हजारो नागरिकांना एनडीआरएफच्या पथकाकडून सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. तसेच एसडीआरएफचेही अनेक पथके ठिकठिकाणी बचाव कार्य करत आहेत.

गुजरातच्या काही भागात अन्यधान्याची टंचाई भासत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याशी फोनवरून संवाद साधत राज्यातील अन्यधान्याच्या साठ्याबाबत माहिती घेतली. तसेच या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी केंद्र सरकार पूर्ण ताकदीनिशी गुजरातच्या पाठीशी आहे, असेही पंतप्रधानांनी आश्वास दिले. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी एनडीआरएफचे आणखी पाच पथक बचाव कार्यासाठी तैनात केले आहेत. तसेच लष्कराचीही मदत घेतली जात आहे. बडौदामध्ये बचावकार्य आणि मदतकार्य मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आले आहे. ज्याठिकाणी पूराचा सर्वाधिक फटका बसला आहे, त्याठिकाणी लष्काराच्या सहा तुकड्या बचाव कार्यात गुंतल्या आहेत.

गुजरात सरकारच्या अधिकृत माहितीनुसार, राज्यातील 140 जलाशय पूर्ण भरली असून 24 नद्या दुथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे आसपासच्या परिसराला धोक्याचा इशारा देण्यात आला आहे. पूराचे पाणी साचल्यामुळे रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून अनेक ठिकाणी वाहतूक खंडीत झाली आहे. राज्यातील 206 धरणांपैकी 122 धरणांच्या परिसराला हाय अलर्ट देण्यात आला आहे.

## बृजभूषण सिंह यांना झटका

# हायकोर्ट पीडितांचे जबाब नोंदवणार

वृत्तसंस्था
नवी दिल्ली



भाजप नेते आणि कुस्ती महासंघाचे माजी प्रमुख बृजभूषण शरण सिंह यांना दिल्ली उच्च न्यायालयाकडून झटका बसला आहे. महिला कुस्तीपटूंनी त्यांच्याविरुद्ध दाखल केलेला लैंगिक शोषणाचा खटला रद्द करण्याची मागणी बृजभूषण सिंह यांनी केली होती. मात्र त्यांची ही मागणी उच्च न्यायालयाने रद्द केली आहे. तसेच उच्च न्यायालय पीडितांचे जबाब नोंदवणार आहे.

बृजभूषम शरण सिंह यांनी त्यांच्याविरोधात सहा महिला कुस्तीपटूंनी दाखल केलेल्या लैंगिक छळाच्या प्रकरणात एफआयआर आणि आरोप रद्द करण्याची विनंती करण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यांनी म्हटले की, केवळ पीडितांचे म्हणणे ग्राह्य धरून तपास पक्षपाती पद्धतीने करण्यात आला आहे. तसेच माझ्यावर खोटे आरोप करण्यात आले, ज्याचा कनिष्ठ न्यायालयाने विचार केला नाही.

बृजभूषण सिंह यांच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायाधीश नीना बन्सल कृष्णा यांनी म्हटले की, जर आरोप निश्चित केले गेले असतील तर सर्व काही गुणवत्तेवर फेटाळले जाऊ शकत नाही. प्रत्येक गोष्टीवर सर्वांगीण आदेश असू शकत नाही. जर तुम्हाला आरोपावरील आदेश रद्द करायचा असेल तर तुम्ही येऊ शकला असता. पण एकदा खटला सुरू झाल्यावर हा अप्रत्यक्ष मार्ग आहे, असे ताशेरे उच्च न्यायालयाने ओढले. सुनावणीवेळी बृजभूषण सिंह यांच्या वकिलाने युक्तिवाद करण्याचा प्रयत्न केला की, एफआयआर दाखल करण्यामागे छुपा अजेंडा आहे. तक्रार करणाऱ्या कुस्तीपटूंचा बृजभूषण सिंह यांना कुस्ती महासंघाच्या अध्यक्षपदावरून काढून टाकण्याचा एक समान हेतू होता, असा दावाही त्यांच्या वकिलाने केला. यावर उच्च न्यायालयाने बृजभूषण सिंह यांच्या वकिलाला लैंगिक छळाचा खटला फेटाळण्यासाठी सर्व युक्तिवादांसह संक्षिप्त नोट तयार करण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली आहे. पुढील सुनावणी 26 सप्टेंबर रोजी होणार आहे.

दरम्यान, भारतीय कुस्तीपटू बजरंग पुनिया, साक्षी मलिक आणि विनेश फोगट यांच्याशिवाय अनेक महिला कुस्तीपटूंनी बृजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप केले आहेत. याशिवाय सात कुस्तीपटूंनी बृजभूषण यांच्यावर खटला दाखल केला आहे. यात एका अल्पवयीन महिला कुस्तीपटूचाही समावेश होता, मात्र नंतर तिने आपली केस मागे घेतली. असे असले तरी इतर कुस्तीपटूंच्या तक्रारीवरून बृजभूषम सिंह यांच्याविरोधात 1000 पानी आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

पान ९ वरुन

### ...आंतरराष्ट्रीय पातळीवर मान खाली घालणारी

विभागाच्या अभियंत्यानं आपली कातडी बचावण्यासाठी या पुतळ्याच्या डिझाईनर व स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला. पुतळा उभारणाऱ्या नौदल अधिकाऱ्यांना, सा.बां.वि. चे अधिकारी व इतरांना त्यांनी यामधून वगळले. या वादग्रस्त व कातडीबचाव गुन्हा नोंदवण्याच्या प्रकाराबद्दल आपण राज्याच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं. मात्र, त्याची कोणतीही दखल घेण्यात आली नाही, असा दावा तिरोडकर यांनी याचिकेत केला. बेजबाबदार बांधकाम व्यावसायिक ज्याप्रमाणे अनधिकृत इमारती किंवा चाळी बांधतो, तसं पुतळा उभारणाऱ्या आपल्या अभियंत्यांमागे राज्य सरकार ढाल बनून उभे राहण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही या याचिकेत करण्यात आलाय. जून 2023 ते नोव्हेंबर 2023 या कालावधीत पुतळा बनवण्यात आला. मालवण येथील प्रति तास 45 किमी वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांचा विचार न करता हे काम करण्यात आल्याचा आरोप तिरोडकर यांनी याचिकेत केला. मालवण येथील स्थानिक नागरिकांनी पुतळा उभारणीत वापरण्यात आलेले नट व बोल्ट गंजल्याच्या परिस्थितीबाबत ऑगस्ट महिन्याच्या प्रारंभी सार्वजनिक बांधकाम विभागाला माहिती दिली होती. मात्र, त्यांनी त्यावर कोणतीही उपाययोजना न करता केवळ ही माहिती मेलद्वारे डिझाईनर व स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांना पाठवली व आपली जबाबदारी पूर्ण झाल्याचा समज त्यांनी करुन घेतला, याकडे तिरोडकर यांनी याचिकेद्वारे लक्ष वेधलं.

### ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

आलेल्या निविदाव्दारे चेतक इंटरप्राईजेस लिमिटेड आणि ॲपको इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेड या संयुक्त कंपन्यांना 1 जून 2017 रोजी मंजूर केले. त्यानुसार 18 डिसेंबर 2017 पासून कंपनीने काम सुरु केले. या मार्गाचे काम हे दोन वर्षात पूर्ण करण्याचे करारात म्हटले होते. मात्र मुदत संपूनही काम पूर्ण झाले नाही. तरीही शासनाने मुदत वाढून दिली होती. महामार्गाच्या आधुनिकीकरणाच्या कामासाठी आवश्यक असणा-या जागेपैकी सर्वसाधारणपणे 91.80% इतकी बोजारहित जागा शासनातर्फे हस्तांतरीतही करण्यात आली होती. दोन वर्ष कालावधी संपल्यानंतरही मुदत वाढ मिळूनही ठेकेदार यांचेकडून मुदत वाढ कालावधीत मासिक 10% यावेगाने काम पूर्ण न होता फक्त 4.6% यावेगाने काम झाले. ठेकेदार यास महामार्ग प्राधिकरणाकडून 03 वेळा कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. कामाची गुणवत्ता तपासणाऱ्या प्राधिकृत अभियंता, मे.ब्लूम एल.एल. सी., यु.एस.ए., शाखा महाड यांच्या मार्फतीने एन.सी. आर. देण्यात आला होता. मात्र तरीही कामाचा दर्जा सुधारला नाही.

# भारत डोजो यात्रा कमिंग सून...

## मार्शल आर्टचा व्हिडीओ शेअर करत तरुणांनी यात सामील होण्याचे आवाहन

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

डोजो म्हणजे मार्शल आर्ट्सचे प्रशिक्षण केंद्र किंवा शाळा, जिथे स्वसंरक्षणासाठी विविध मार्शल आर्टचे प्रकार शिकवले जातात. या पोस्टवरून राहुल लवकरच स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी काहीतरी पुढाकार घेणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.



राहुल यांनी लिहिले- जिउ-जित्सू हा फिट राहण्याचा मार्ग आहे. भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान आम्ही हजारो किलोमीटरचा प्रवास करत असताना आमच्या शिबिरात रोज संध्याकाळी जिउ-जित्सूचा सराव असायचा. तंदुरुस्त राहण्याचा हा एक सोपा मार्ग होता. पण ते लवकरच सामुदायिक उपक्रमात बदलले. आम्ही ज्या शहरात राहिलो त्या प्रत्येक शहरात यात्रेत सहभागी होणारे लोक आणि त्या शहरांतील तरुण मार्शल आर्ट्सचे विद्यार्थी सहभागी झाले.

या तरुणांना या कोमल कलेचे सौंदर्य सांगणे हा आमचा उद्देश होता. ध्यान हे जिउ-जित्सू, एकिडो आणि अहिंसक तंत्रांचे संयोजन आहे. त्यांनी हिंसेऐवजी सौम्यता अंगीकारावी अशी आमची इच्छा होती, ज्यामुळे त्यांना अधिक दयाळू आणि सुरक्षित समाज निर्माण करण्यात मदत होईल.

या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त, मला माझा अनुभव तुम्हा सर्वांसोबत शेअर करायचा आहे, आशा आहे की तुमच्यापैकी काहींना सौम्य कलेचा सराव करण्याची प्रेरणा मिळेल. इंडिया डोजो टूर लवकरच येत आहे. डोजो ही एक प्रकारची मार्शल आर्ट ट्रेनिंग स्कूल आहे. लोक ज्युडो, कराटे किंवा इतर कोणत्याही मार्शल आर्टचा सराव करणारे ठिकाण. जपानी भाषेत डोजो म्हणजे जाण्याचा मार्ग. सर्वात जुने डोजो बौद्ध मंदिरांमध्ये बांधले गेले होते. जिथे सखोल प्रशिक्षण झाले. यात केंदोची मार्शल आर्ट तसेच ध्यानाचा समावेश होता.

व्हिडिओमध्ये राहुल गांधी मुलांना सांगतांना दिसत आहे की, ते आयकिडोमध्ये ब्लॅक बेल्ट आणि जिउ-जित्सूमध्ये ब्लू बेल्ट आहेत. 2017 मध्ये काँग्रेसच्या X वर केलेल्या पोस्टनुसार, राहुल यांना आयकिडोचे किमान 130 तंत्र माहित आहेत.

## बांगलादेशात जमात-ए-इस्लामीवरील बंदी हटली

वृत्तसंस्था
ढाका

बांगलादेशातील अंतरिम सरकारने बुधवारी जमात-ए-इस्लामी पक्षावरील बंदी उठवली. जमात-ए-इस्लामी हा बांगलादेशातील सर्वात मोठा मुस्लीम पक्ष आहे. हसीना सरकारने 1 ऑगस्ट रोजी त्यावर बंदी घातली होती. विद्यार्थ्यांच्या आंदोलनात दंगल भडकवल्याचा आरोप त्यांच्यावर होता.

बांगलादेशच्या गृहमंत्रालयाने नोटीस जारी करून म्हटले आहे की, जमात-ए-इस्लामी पक्ष आणि त्याच्याशी संलग्न संघटनांचा दहशतवादी कारवायांमध्ये सहभाग असल्याचा कोणताही पुरावा नाही. त्यामुळे त्यांच्यावर घातलेली बंदी उठवली जात आहे. जमात-ए-इस्लामी पक्षाच्या नेत्यांची ढाका येथे बैठक झाली. निवडणूक लढवण्यावरील बंदी उठवण्यासाठी पक्ष सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जमात-ए-इस्लामी पक्षाच्या नेत्यांची ढाका येथे बैठक झाली. निवडणूक लढवण्यावरील बंदी उठवण्यासाठी पक्ष सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## हैदराबादेत 175 कोटींचा घोटाळा, SBIच्या मॅनेजरला अटक

वृत्तसंस्था
हैदराबाद

हैदराबाद येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (एसबीआय) शाखा व्यवस्थापकाला आणि त्याच्या साथीदारांना 175 कोटींच्या फसवणुकीप्रकरणी अटक करण्यात आली आहे. सायबर सिक्युरिटी ब्युरोच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेला बँक मॅनेजर शमशीर गंज भागात असलेल्या एसबीआय बँकेत काम करतो.

व्यवस्थापकाने ठगांसह त्याच्या शाखेत बनावट खाती उघडली. सायबर फसवणुकीच्या माध्यमातून त्यांच्यात पैसे जमा करण्यात आले. त्या बदल्यात मॅनेजरला कमिशन मिळायचे. मधू बाबू असे अटक करण्यात आलेल्या बँक मॅनेजरचे नाव आहे. त्याचा पार्टनर 34 वर्षांचा जिम ट्रेनर संदीप शर्मा आहे.

शमशीर गंज येथील एसबीआय शाखेतील सहा खात्यांविरोधात सायबर सुरक्षा ब्युरोकडे तक्रार आली होती. या पथकाने तपास केला असता दोन महिन्यांत (मार्च आणि एप्रिल) या खात्यांमधून मोठ्या रकमेचे व्यवहार झाल्याचे आढळून आले.

## डॉक्टर्सविरुद्ध एक शब्द नाही बोलले

### त्यांना कधीच धमकावले नाही, त्यांचा निषेध योग्य आहे

वृत्तसंस्था
कोलकाता



बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी म्हणाल्या की, त्यांनी आंदोलन करणाऱ्या डॉक्टरांना कधीही धमकावले नाही. ममता यांनी गुरुवारी सोशल मीडियावर एक पोस्ट केली. यात ममता यांनी लिहिले की, काही लोक आरोप करत आहेत की मी आंदोलन करणाऱ्या डॉक्टरांना धमकावले आहे. हे पूर्ण खोटे आहे.

21 दिवसांपासून संपावर असलेल्या बंगालच्या ज्युनियर डॉक्टरांना ममता बॅनर्जी यांनी धमकावल्याचा आरोप भाजपने केला आहे. आरजी कार मेडिकल कॉलेजमधील प्रशिक्षणार्थी डॉक्टरची हत्या आणि बलात्कारप्रकरणी न्यायाची मागणी डॉक्टरांकडून होत आहे. त्यांनी रुग्णालयातील कामकाजाचे वातावरण आणि सुरक्षिततेबाबतही कारवाई करण्याची मागणी केली आहे.

9 ऑगस्ट रोजी वैद्यकीय महाविद्यालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टरचा मृतदेह अर्धनग्न अवस्थेत आढळून आला होता. तिच्यावर बलात्कार झाल्याची पुष्टी झाली. 10 ऑगस्टपासून डॉक्टरांनी संप सुरू केला आहे.

प्रशिक्षणार्थी डॉक्टरांना न्याय मिळावा यासाठी विद्यार्थ्यांनी 27 ऑगस्ट रोजी नबन्ना मोर्चा काढला होता. यावेळी पोलिस आणि विद्यार्थ्यांमध्ये झटापट झाली आणि अनेक जण जखमी झाले. या कारवाईच्या निषेधार्थ भाजपने 28 ऑगस्ट रोजी बंगाल बंद पुकारला होता. यामध्ये भाजप नेत्यांवर गोळीबार, बॉम्ब फेक आणि दगडफेक करण्यात आली.

ममता यांनी लिहिले की, "मला समजले आहे की प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडियामध्ये माझ्याविरोधात खोट्या बातम्या प्रसिद्ध केल्या जात आहेत. यामध्ये मी 28 ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांमध्ये दिलेल्या भाषणाचा हवाला दिला आहे.

## ब्रिटनमध्ये हेटस्पीच पसरवणाऱ्या 24 मशिदींची चौकशी

लंडन

ब्रिटनमध्ये द्वेषयुक्त भाषणाविरोधात मोठी कारवाई सुरू झाली आहे. द्वेषपूर्ण भाषणाच्या आरोपाखाली 24 मशिदींची चौकशी सुरू आहे. या मशिदी पाकिस्तानी वंशाचे लोक चालवतात. या मशिदी लंडन, बर्मिंगहॅम, लिव्हरपूल आणि मँचेस्टरसारख्या ब्रिटिश शहरांमध्ये आहेत. या मशिदींमधून गैर-मुस्लिमांविरुद्ध द्वेषयुक्त भाषणातून फतवे काढण्यात आले. दहशतवादी संघटना हमास आणि त्यांच्या सदस्यांच्या समर्थनार्थ या मशिदींमधून द्वेषपूर्ण भाषण दिल्याचा आरोपही आहे. आरोपी दोषी आढळल्यास त्यांना 14 वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. गाझामध्ये युद्ध सुरू झाल्यापासून या मशिदींमधून द्वेष पसरवण्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. इस्रायल आणि ज्यूंच्या विरोधात विष पसरवणाऱ्या अशा मौलवी आणि धर्मोपदेशकांना आमंत्रित केल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

## कंगना राणावत यांना बलात्काराचा खूप अनुभव, माजी खासदाराचे वादग्रस्त वक्तव्य

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

शिरोमणी अकाली दलाचे नेते आणि पंजाबचे माजी खासदार सिमरनजीत सिंग मान यांनी खासदार कंगना रणौत यांच्याविरोधात अपमानास्पद वक्तव्य केले आहे. त्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. शेतकरी आंदोलनावेळी झालेल्या बलात्कारांवरून कंगना रणौत यांनी केलेल्या विधानाला ते प्रत्युत्तर देत होते.

“याप्रकरणी काय बोलावं हे मला कळत नाहीय. पण कंगना रणौत यांना बलात्काराचा खूप अनुभव आहे. तुम्ही त्यांना विचारू शकता की बलात्कार कसा होतो, जेणेकरून लोकांना समजेल की बलात्कार कसा होतो”, असं संगरूरचे माजी खासदार सिमरनजीत सिंग म्हणाले. आता रद्द करण्यात आलेल्या कृषी सुधारणा कायद्यांबाबत शेतकऱ्यांच्या आंदोलनाबाबत भाजपा खासदाराने अलीकडे केलेल्या वक्तव्याबाबत विचारले असता सिमरनजीत मान यांनी ही टिप्पणी केली. पंजाब महिला आयोगाने या वक्तव्याची दखल घेतली असून याविरोधात कारवाई केली जाईल, असं त्यांनी म्हटलंय.



# यशासाठी त्यांनी शारीरिक संबंध ठेवले; 30 वर्षे जुन्या नात्याचा हवाला

## ट्रम्प यांची हॅरिस यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट शेअर केली आहे. हॅरिस यांनी राजकारणातील कारकीर्द पुढे नेण्यासाठी शारीरिक संबंधांचा वापर केल्याचे ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.



खरं तर, 1990 च्या दशकात, हॅरिस त्यांच्यापेक्षा 30 वर्षांनी ज्येष्ठ असलेल्या सॅन फ्रान्सिस्कोचे माजी महापौर विली ब्राउन यांच्याशी नातेसंबंधात होत्या. तेव्हा त्या कॅलिफोर्निया राज्य विधानसभेच्या अध्यक्षही होत्या. विली ब्राउनसोबतच्या संबंधांमुळे हॅरिस यांना राजकारणात पुढे जाण्यास मदत झाल्याचा आरोप ट्रम्प यांनी पोस्टद्वारे केला आहे.

ट्रम्प यांनी त्यांच्या एका समर्थकाची पोस्ट पुन्हा शेअर केली. त्यात हॅरिस आणि हिलरी क्लिंटन एकत्र दिसत असलेल्या फोटोचाही समावेश आहे. याद्वारे ट्रम्प यांनी हिलरी क्लिंटन यांच्यावरही भाष्य केले. खरं तर, हिलरी यांचे पती आणि अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्यावर 1995 मध्ये व्हाईट हाऊसमधील इंटर्न मोनिका लेविन्स्कीसोबत शारीरिक संबंध असल्याचा आरोप करण्यात आला होता.

दोघांचे नाते 18 महिने टिकले. 26 जानेवारी 1998 रोजी एका दूरचित्रवाणी संबोधनात क्लिंटन म्हणाले की, त्यांचे लेविन्स्कीसोबत कोणतेही अफेअर नाही. या वादामुळे क्लिंटन यांच्याविरोधात हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये महाभियोग प्रस्तावही आणण्यात आला होता. 2000 च्या अध्यक्षीय निवडणुकीत या वादाचा फटका डेमोक्रॅटिक पक्षाला सहन करावा लागला होता.

न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, गेल्या 10 दिवसांत ट्रम्प यांनी कमला हॅरिसवर कोणतीही आक्षेपार्ह टिप्पणी करण्याची ही दुसरी वेळ आहे. याआधी 18 ऑगस्ट रोजी ट्रम्प यांनी हॅरिस आणि विली ब्राउन यांच्या नात्याबाबत एक पोस्टही टाकली होती. यापूर्वी ट्रम्प यांनी कमला हॅरिस यांच्या वांशिक अस्मितेवरही प्रश्न उपस्थित केले होते. ट्रम्प यांनी एका मुलाखतीत विचारले होते की, कमला हॅरिस भारतीय आहेत की कृष्णवर्णीय? अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष म्हणाले होते की, कमला हॅरिस नेहमीच स्वत:ला भारतीय वारसा म्हणून सांगतात, पण काही वर्षांपूर्वी अचानक त्या कृष्णवर्णीय झाल्या.

## जपानमध्ये धडकले वर्षातील सर्वात शक्तिशाली वादळ शानशान

वृत्तसंस्था
टोकियो

यावर्षीचे सर्वात शक्तिशाली वादळ 'शानशान' जपानला धडकले आहे. शानशान गुरुवारी सकाळी 8 वाजता दक्षिण-पश्चिम क्यूशू बेटावर पोहोचले. NYTच्या मते, वादळामुळे ताशी 252 किमी वेगाने वारे वाहण्यासह मुसळधार पाऊस पडत आहे.

वादळामुळे अनेक भागांत मोठे नुकसान झाले आहे. जपानमधील टायफून क्रमांक 10 म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शानशानने 250,000 हून अधिक घरांची वीज खंडित केली आहे, असे जपान हवामान संस्थेने सांगितले.

जपानच्या क्योडो न्यूजनुसार, गुरुवारी गामागोरी येथे भूस्खलनाने एक घर गाडले आणि एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला. याशिवाय 2 जण जखमी झाले आहेत. देशभरातील 10 लाख लोकांना या वादळाचा फटका बसला आहे. त्याचबरोबर 40 हून अधिक लोक जखमी झाले आहेत. गमागोरी, आयची प्रीफेक्चरमध्ये भूस्खलनामुळे एका घराला तडाखा बसला. मदत कर्मचारी बेपत्ता लोकांचा शोध घेत आहेत. जपानमधील मियाझाकी येथे शानशान टायफूनचे आगमन झाल्यानंतर जोरदार वारे वाहू लागले आणि त्यामुळे टिनचे शेड वीजेच्या तारात अडकले.

252 किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे



भूस्खलनाने 3 जणांचा मृत्यू

## पाच दिवस पासपोर्ट ऑनलाईन पोर्टलची सेवा बंद

नवी दिल्ली

पासपोर्टसाठी (पारपत्र) अर्ज करणाऱ्या अर्जदारांसाठी महत्त्वाची बातमी आहे. पुढील पाच दिवस पासपोर्ट ऑनलाईन पोर्टलची सेवा बंद राहणार आहे. त्यामुळे या काळात नव्या अपॉइमेंट्स दिल्या जाणार नाहीत. तसंच, आधी दिलेल्या अपाइमेंट्स रद्द करून त्यांना पुढच्या तारखा दिल्या जाणार आहेत. तांत्रिक कामांसाठी २९ ऑगस्ट ते २ सप्टेंबरपर्यंत पासपोर्ट सेवा पोर्टल बंद राहणार आहे. या काळात हे पोर्टल नागरिकांसाठी आणि MEA/RPO/BOI/ISP/DoP/Police Authorities यांच्यासाठी बंद राहणार आहे. ३० ऑगस्टसाठी दिलेली अपाइमेंट पुढे ढकलण्यात येईल आणि अर्जदारांना यासंदर्भात कळवण्यातयेईल, असं पासपोर्ट सेवा पोर्टलकडून सांगण्यात आलं आहे.